# कल्प 'क' था



मधू शिरगांवकर

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# कल्प ‘क’ था

लेखिका : मधू शिरगांवकर

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

## कल्प ‘क’ था

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# कल्प ‘क’ था

लेखिका : मधू शिरगांवकर

Plot 13, Mangaldham, Pune 411038

सम्पर्क- मोबाइल व व्हॉट्सॅप – 09822208197

ई मेल -- madhushirgaonkar@gmail.com

मुखपृष्ठ फोटो: कल्पेश तांबेकर

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : १४ डिसेंबर २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखिकेची ओळख



सौ मधू शिरगांवकर

वय ५४ वर्षे.

फार्मास्युटिकल ट्रेनर आणि कन्सल्टंट.

प्रमाणपत्रधारक योगशिक्षिका : yog Daily हे फेसबूक पेज चालवते. त्यावर दार आठवड्यात योगविषयक माहिती, त्यातील चुकीचे समज व काही योगासनांची प्रात्यक्षिके असा विडिओ बेस्ड कार्यक्रम करते. इविद्यालोक या स्वयंसेवी संघटनेची सक्रिय स्वयंसेविका. टीम विजन या दृष्टी आव्हानितांसाठी कार्य करणाऱ्या संस्थेसाठी पुस्तकवाचन

पती, सासू , व आईवडील यांच्यासह गेली २८ वर्षे पुण्यात वास्तव्य. मुले नोकरीनिमित्त बाहेरगावी असतात. पन्नासाव्या वर्षी लेखनास सुरवात केली. लेखन करतानाचा आनंद सर्वात महत्वाचा आणि वाचकांची दाद ही सगळ्यात मोठी पावती असं मानते.

वाचता वाचताच लेखनाची सुरवात झाली. जवळपास ५० लघुकथा, पाच दीर्घकथा, अनेक ललित लेख, व सध्या एका कादंबरीचे लेखन सुरू आहे.

सुरवातीला मी केवळ माझ्या आनंदासाठी लिहीत गेले. माझा आनंद पुस्तकरूपाने आपल्यापर्यंत पोहोचवण्याचं सर्व श्रेय ईसाहित्यला जातं. नाहीतर हे लेखन माझ्या काही जवळच्या मित्रमैत्रिणीशिवाय कोणाहीपर्यंत पोहोचण्याची सुतराम शक्यता नव्हती. इ साहित्यचे मन:पूर्वक आभार.

ईसाहित्य ने प्रकाशित केलेली याआधीच्या पुस्तकांची लिंक पुस्तकाच्या शेवटी दिलेली आहेच.

मातृभारती या साइटवरही ११ भागांची दीर्घकथा आठवड्यातून दोन वेळा या पद्धतीने प्रकाशित केली आहे.

"माझा मराठीचा बोल" दिवाळीअंकात २०१७, २०१८, २०१९, २०२० च्या आवृत्यांमध्ये कथा व लेख प्रकाशित.

"श्री व सौ" या २०१९ च्या दिवाळीअंकात तीन लघुकथा 'कथात्रयी' या सदरात प्रकाशित.

निनाद या २०२० मध्ये अमेरिकेतून प्रसिद्ध झालेल्या विशेष अंकात लघुकथा प्रकाशित.

ग्रहांसंकेत या मासिकामध्ये श्री रमणमहर्षींवरील लेख प्रकाशित जून २०२०

E mail : madhushirgaonkar@gmail.com
Mobile number: 9822208197

## मनोगत

माझं हे पाचवं पुस्तक "कल्पकथा", कथासंग्रहाच्या रूपात आपल्यापुढे ठेवताना मला अत्यंत आनंद होत आहे. यात प्रेम, मैत्री, आणि नाती, जे जीवनाचा अविभाज्य भाग असतात, त्यांचे विविध रंग वाचायला मिळतील.

या संग्रहात एकूण १३ कथा आहेत. पहिल्या अकरा कथा या मी स्वतः लिहिलेल्या आहेत. त्यातील काही कथा दिवाळीअंकांमध्ये प्रसिद्ध झाल्या आहेत. आणि शेवटच्या दोन कथा या मेरी टोबोर यांच्या “To Thine Own Self” या पुस्तकातील काही भागावर आधारित अशा कथा आहेत.

इसाहित्यचे वाचक अत्यंत आपुलकीने अभिप्राय देतात हा आजवरचा अनुभव याही पुस्तकाच्या बाबतीत खरा ठरेल ही आशा आहे.

यापूर्वीच्या माझ्या पुस्तकांना तुम्ही जे प्रेम दिलंत ते याही पुस्तकाला द्याल या खात्रीसह हे पुस्तक तुम्हा सर्वांपुढे ठेवत आहे. धन्यवाद!

# अर्पणपत्रिका



ज्यांनी मला कल्पना आणि वास्तव यांच्यातील समतोल साधायला शिकवला,

त्या माझ्या आई आणि बाबाना

डॉ. सौ. उल्का दत्तात्रय कोल्हटकर,

श्री दत्तात्रय रामचंद्र कोल्हटकर

यांना हा कथासंग्रह अर्पण करताना मला अत्यंत आनंद होत आहे.

# कल्प 'क' था

# अनुक्रमणिका

१. प्रेम म्हणजे प्रेम असतं : तुमचं आमचं सेम नसतं ( "श्री व सौ" दिवाळीअंक २०१९ कथात्रयी मध्ये प्रसिद्ध )

२. संगीत ( "श्री व सौ" दिवाळीअंक २०१९ कथात्रयी मध्ये प्रसिद्ध )

३. जगावेगळी ("श्री व सौ" दिवाळीअंक २०१९ कथात्रयी मध्ये प्रसिद्ध )

४ .चंद्रिका ( निनाद दिवाळीअंक २०१९ मध्ये प्रसिद्ध )

५. गण्या, मनी आणि जांभूळ (माझा मराठीचा बोल दिवाळीअंक २०१९ मध्ये प्रसिद्ध )

६. नि:शब्द

७. न दिली वचने

८. जाणता राजा

९. @५०+

१०. तू आणि मी

११. वर

१२. नातीगोती ( मेरी टॅबोर यांच्या To Thine Own Self मधील कथेवर आधारित)

१३. तो आत्ता इथे नाही ( मेरी टॅबोर यांच्या To Thine Own Self मधील कथेवर आधारित )

# १ प्रेम हे प्रेम असतं : तुझं माझं सेम नसतं

“मॅडम, गरीबाच्या पोटाला द्या की काही, .... ओ मॅडम!”

“रवी, फटकाऊन काढीन हां आता. गप्पं बस जरा.”

“आयला चिन्मयी, राव, किती गप्पं बसायचं? पूरा तास झाला आपल्याला या झाडाखाली बसून. तू त्या खोडाला टेकून बसलीस कधीची ढगांत नजर लावून, तो ढग आता बरसेल, मग बरसेल डोळ्यातून, आणि मग “झाले मोकळे आकाश” म्हणत मस्त चहा पिऊ म्हटलं तर कसलं काय ...”

“रव्या............! तुला खाण्या पिण्या शिवाय दुसरं काही दिसत नाही का रे?”

“घ्या आता! त्या कॅंटीन मधे मस्त कटवडा ओरपणार होतो, तेवढ्यात हाताला धरून उठवलंस, दरादरा ओढत या झाडाखाली बसवलंस, मला वाटलं माझ्यासाठी काहीतरी पाठवलंय काकूंनी, मस्त कोथिंबीर वडी किंवा कायतरी, ते तर काही देईनास, वर पोरं परत गेल्यावर ना ना प्रश्न विचारतील, की का बुवा नक्की काय केलं, तर सांगायला निदान काही चमचमीत पदार्थ तरी....”

भडकून चिन्मयीने जवळ पडलेली काटकी भिरकावली रवीच्या दिशेने.

मग मात्र तो मस्त गवतावर लोळत होता तो उठून बसला.

“चिन्मयी, माहौल बनवणं पुरे झालं, बोला आता पोपटासारखं पटापट. काय झालय सगळ्या दुनियेची मयत झाल्यासारखं तोंड करून बसायला?”

चिन्मयीने रागाने एकदा रवीकडे पाहीलं, पण मग मात्र तिचे डोळे भरून आले. घळाघळा डोळ्यातून घन बरसू लागले. रवी शांतपणे बसून राहीला. मग जवळच पडलेला चिन्मयीचाच लेडीज रुमाल उचलून त्याने तिच्यापुढे धरला. जरा शांत झाल्यावर चिन्मयी ने रवीकडे पाहीलं.

“इर्शाद...”

“पंकज ने भक्ती ला रोज दिलं.”

“ओह, ओह, ग्रेट! अभिनंदन! तुझी खास मैत्रीण गटली होय पंक्याला? आयला, मग तू रडतीयेस का? रडायचं बिडायचं लग्नाच्या वेळी बाळा, ती काय आत्ताच तुला सोडून नाही चालली.”

“रवी..... तू ना, अशक्य माणूस आहेस. तुझ्याशी बोलण्यातच काही अर्थ नाही. शी...”

“चिन्मयी, मग तू सांग तुला का रडू येतय?”

“मला पंकज आवडतो . प्रेम आहे माझं त्याच्यावर. मी जगूच शकत नाही रे त्याच्याशिवाय. पण, .... पण...” परत तिच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या.

“हं! बरं! मग, आत्ता इथे बसून रडण्याशिवाय तू काय केलंस याविषयी?”

“म्हणजे?”

“म्हणजे, ही परिस्थिती बदलायला तू काय केलंस?”

“हॅव यू लॉस्ट इट रवी? त्याने रेडरोज दिलय भक्तीला! रोज डे ला!”

“हो मग?”

“हो मग काय?”

“अगं त्याने भक्तीला रोज दिलं आणि तुझं पंकज वर प्रेम आहे या तशा एकमेकांशी निगडीत गोष्टी असतीलही, पण म्हणून तू काहीच करणार नाहीस? रडत बसणार?”

“मग मी काय करू?”

आपले मोठमोठाले काळेभोर डोळे रवीवर रोखून चिन्मयीने विचारलं, आणि बोलता बोलता रवीला घसा खाकरायला लागला.

“हं, तू काय करावंस बरं?”

“तू पंकजला रोज दे. फिट्टम फाट.”

“मुली नसतात रे देत. आणि त्याने तिला दिलय हे माहीत असून?”

“अगं तुझ्या जीवन मरणाचा प्रश्न आहे ना?”

“हो, पण, तरी, दोघं मिळून चेष्टा करतील रे माझी.”

“काय सांगतेस काय? असं करेल पंकज?आणि इतक्या उथळ मुलावर तू प्रेम बीम करतेस? जगू न शकण्याइतकं?”

“रवी.....”

“बघ आता, तूच तर म्हणालीस चेष्टा करेल तुझ्या भावनांची? एनी वे, गृहीत धरू की चेष्टा करेल, पण ते महत्वाचं नाहीच आहे. प्रेम तुला वाटतय ना त्याच्याविषयी? मग हो मोकळी देऊन गुलाब. तुम्हा मुलींना नाही का दहा दहा फुलं मिळतात , मिरवता की मग.”

“ए, रवी, तू कोणाला दिलंस रोज?”

“येडी झाली का? दहा रुपयाचा गुलाब रोज डे ला पन्नास रुपयाला पडतो. आपली आठवड्याची चहाची सोय कोण घालवेल?”

“अच्छा, म्हणजे विचार होता तर? हं, हं, सांगच आता, कोणाला देणार होतास?”

रवीने एक हात केसातून फिरवला, शांतपणे चिन्मयी कडे पाहत म्हणाला,

“छे गं, कोणाला द्यायचं म्हणून नव्हती केली चौकशी, गुलाबांचा स्टॉल टाकून काय चार पैसे कमावता येतात का म्हणून बघत होतो.”

“बास का? तुझा लठ्ठ पॉकेटमनी मला माहित आहे रव्या. उगाच थापा मारू नकोस. खरं खरं सांग?”

“कसल्या भोचक असता गं तुम्ही पोरी! आत्ता रडत होती पंकजने भक्तीला गुलाब दिला म्हणून, आणि आता बातमी काढायची म्हटलं की कशी आली उत्साहात.”

चिन्मयीचा चेहरा पडलेला बघून गडबडीने... “बरं बरं ठीक आहे. चल मला कटवडा खिलव मग तिथंच बघू कोणी दिसते का गुलाब देण्यालायक.”

“खादाड..... सतत खाण्याबद्दल विचार ... तू काय कोणाला गुलाब देणार?”

“हे घे, ... तुझ्यासाठीच आणला होता.” रवीने हळूच गुलाब पुढे केला. अनाहुतपणे चिन्मयीने तो घेतलाही.

“रवी..तू, मला ..”

"ए, टेन्शन नाही घ्यायचं. मला माहीत आहे तुला पंकज आवडतो. आणि मला तू आवडतेस. तुझ्या हातात गुलाब बघून कदाचित पंकजचं तुझ्याकडे लक्ष जाईल, तो तुझा विचार करेल. आणि मला आवडणाऱ्या मुलीला सतत आनंदात पाहायला मला आवडेल. चलो, मिशन पंकज की ओर..."

रवी चालायला लागला बॅग पाठीवर टाकून आणि चिन्मयी प्रथमच आपल्या या पाठमोऱ्या जीवलग मित्राकडे नव्याने पाहायला लागली!

# २ जगावेगळी

बस एका कायम गतीने निघालीय. डांबरी काळा कुळकुळीत रस्ता, सरळसोट, चमकता. ती सातआठ वर्षांची चिमुरडी या गतीशी एकरूप, बसच्या खिडकीशी बसलेली. खिडकीतून येणाऱ्या वाऱ्याशीही. उडणाऱ्या बटांना सावरण्याचंही भान नाही. किंबहुना तशी गरजच नाही. ती कुठे उरलीय वेगळी ? अंगावर येणाऱ्या वाऱ्यापासून. चैत्रातला तो काहीसा उष्ण वाराच बनून राहिलीय.

हे असं दिसेल त्या बरोबर एकरुप होण्याची अलिकडेच लागलेली सवय, वय नकळतं ७, ८ वर्षांचं. याआधीही होत असेल असं पण ते कळण्याइतपत वेगळेपणच कळलं नसेल बहुधा.

तिच्या या अशा हरवून जाण्यावर आईचा करवाद. कधी चुलीवर शिजणाऱ्या भाताच्या पातेल्याबरोबर तादात्म्य. रटरटणाऱ्या टम्म फुगलेल्या शितात, कडेला जमलेल्या पातळ पापुद्र्यात, वर उकळणाऱ्या पेजेत आणि तांदळाच्या दरवळात ही संपूर्ण हरवून बसणार. नजर एकटक लागलेली.

"कसलं दळभद्र वेड म्हणावं याला? सतत मेली तंद्री." आईची काळजी अशी बाहेर पडावी.

परड्यात गेली की तर संपलच सगळं. इंचाइंचाने तरारून उठणारे कोंब, लाल हिरवी पालवी, उमलणारी कळी आणि त्याबरोबर पसरणारा सुगंध हे सगळंच तिने बनून जावं.

कोणत्याही गोष्टीचा आनंद घ्यायचा तर मन जरा बाहेर ठेवावं लागतं. हे कोण सांगणार तिला?

उमलणाऱ्या कळीला उमलण्याचं कसलं कौतुक? ती फक्त उमलण्यात मग्न. दरवळणाऱ्या सुगंधाला दरवळ कसा समजावणार?

वय वाढत गेलं तसं हे वाढतच गेलं. फक्त आपल्यापुरतं ठेवाण्याइतपत भान राखायला शिकली, त्यामुळे नादीष्ट एवढीच उपाधी चिकटली. कोणी वेड्यात गणना नाही केली इतकंच.

अलिकडे सामान्य गोष्टीत मन बाहेर ठेवणं जमे तिला, पण निसर्गाच्या बाहेर राहणं कर्मकठीण.

कधी आकाशाची निळाई, कधी काळ्याभोर ढगाचं जडावलेपण, कधी पडणाऱ्या पावसाच्या थेंबाची संपून जाण्याची हुरहूर, तर कधी त्या पावसाच्या रिमझिमीचा स्वरच व्हावं हिने. सुर्यकिरणांच्या कवडशातला धुलीकणही कधी होऊन मनसोक्त तरंगावं. कधी गच्चीत भर उन्हाचं जाऊन हिने भराभर कपडे काढून

आणावेत आत , जना कामवाली म्हणे "अवं आसं काय सुकू द्या की जरा,ताई"

"अगं भिजतील ना,"

"आता ग बया,काय पावसाचे दिस हाईत का लक्षान,?" असं म्हणेपर्यंत अचानक वारं सुटावं, ढग भरून यावेत आणि पावसाला सुरूवात व्हावी. हळू हळू घरच्यांच्या अंगवळणी पडलं हे सगळं.

हाती घेतलेलं काम समरसून करायची सवय, जणू ते कामंच बनून जावं तिने. पण स्वत:ला संपवणार कसं ते काम? त्यामुळे काम काळ वेग यांचा ताळ बसणं महा मुश्किल.

विषयांच्या पार अंतरंगात शिरावं, पण आवडीचा विषयच उत्तरात तीन तास लिहावा. मग मार्क मिळावेत कसे? मैत्रिणी होत्या पण त्या विषय समजावून घ्यायला आणि नंतर मागून हसायला. हे प्रकरण कळावंच कसं कुणाला? पण तिला कुठे कधी कुणाची गरज वाटली? ती होती मग्न, दिसेल त्यात, भावेल त्यात.

वडिलांनाही काळजी वाटे, पण हिच्या या वेगळेपणाची पुरेपूर जाण होती त्यांना आणि मनोमन कौतुकही या जगावेगळ्या लेकीचं.

सागरकिनारी सागराकडे एकटक पाहात बसलेल्या तिच्या लोभस रुपाच्या तो प्रेमात पडला. त्याला कुठे माहित होतं तो

सागरालाच पाहात होता, तिला नाहीच. प्रथमदर्शनाचं आकर्षण इतकं खिळवून ठेवणारं होतं की मागचा पुढचा विचार न करता तिच्या मागोमाग तिच्या घरी पोहोचला. म्हणाला तुमच्या मुलीशी लग्न करायचंय. हे ही जगावेगळंच. काही काळ सगळेच स्तब्ध. वडील  गोंधळून हिच्याकडे पाहू लागले तेव्हा हिने फक्त एकदा नजर वर करून पाहिलं याच्याकडे व आत निघून गेली. मग सावरून काकांनी चौकशी केली, "कोण कुठला,?" गावात मामाकडे आलेला, मोठं घराणं, हा शहरात.

"आता घरी जा तुम्ही, उद्या मी स्वत:च तुमच्या मामांना भेटेन". काकांनी समजावून घरी धाडले. इतकं झाल्यावर रात्री सर्वांनी हिला समोर बसवून विचारलं, तर म्हणाली, "मी इथे घरी आल्यावरच पाहिला त्याला, बाकी काहीच नाही माहित." हिच्यावर अविश्वास दाखवणं शक्यच नव्हतं. गरजेपोटीही कधी खोटं बोलली नव्हती आजतागायत. ही खोलीत गेल्यावर आई म्हणाली "होत असेल तर उरकावं म्हणते मी लग्न. शिक्षणाचं शेवटचं वर्ष आहे. अशा नादीष्ट मुलीशी संसार म्हणजे रोज तारेवरची कसरत. आकाशाएवढं प्रेमच तारेल हे तारू. सामान्याचं काम नाही. उद्या दोघे भाऊ जाऊनच या जमेनिसांकडे."

हिला फक्त त्याचे डोळे आठवत राहिले, समुद्रच जणू , अंत न लागणारे. हा रात्रभर तळमळत राहिला. शेवटी सकाळी मामाला व

मामीला एकदमच बोलला. नाव माहित नाही पण घराच्या वर्णनावरून मामा मामीला लगेच अंदाज आला. दोघांनी चमकून पाहिलं एकमेकांकडे.

म्हणावं तर मुलीत दोष काहीच नाही पण पाणी अगदीच निराळं. कसं सांगावं?

हा आंघोळीला गेल्यावर दोघांनी वेळ घेण्याचं ठरवलं. हिचे वडिल काका भेटायला आल्यावर त्याच्या आईवडिलांशी बोलतो व कळवतो असं म्हणाले. हा म्हणाला "मला भेटायचय तिला."

"काय सांगावं?" मामी म्हणाली उद्याच वन्संना बोलावून घेते मग बघू. तिच्यावर धर्मसंकटच आलं हे. तिने ताबडतोप फोन लावला नंणदेला. "याच सरळ इकडे निघून, फोनवर नाही सांगता यायचं."

आई वडिल धसका घेऊन आले. मामीने त्यांना हिच्या वेगळेपणाविषयी तिच्या कुवतीनुसार कल्पना दिली. पण लग्नाचा विषय टाळणारा मुलगा आपण होऊन लग्नाचा विषय काढतोय व वहिनी सांगतेय त्यावरून मुलगी थोडी नादीष्ट वाटते एवढंच. असा विचार त्यांनी केला. घराण्याविषयी मामा मामी चांगलंच बोलत होते. तरी दोघांनी एकदा भेटावं असं ठरलं.

आईने हिला समजावलं आज तरी ती तंद्री लावून बसू नकोस. नीट बोल. हिने मान हलवली. तो म्हणाला “समुद्रावर जावू.” ही लगेच ‘हो’ म्हणाली, खुद्कन हसली आणि मग पुढे त्याला कशाचीच गरज उरली नाही. दोघे कितीतरी वेळ बसून राहिले वाळूत. ही समुद्राकडे पहात आणि तो तिच्याकडे. बऱ्याच वेळाने अचानक भानावर आली. पट्कन वळून म्हणाली “समुद्रकिनारी भानच उरत नाही मला.” तो म्हणाला “आज मलाही नाही उरलं.” ती त्याच्या डोळयात पाहता पाहता त्याच्यातच हरवली आणि त्याला एका न सांगता येणाऱ्या उत्कट भावनेने घेरलं.

समुद्रालाही भरतं आलं, पार दोघांच्या पायांपर्यंत लाटा आल्या तेव्हा दोघं उठले.

रितीनुसार लग्न लागलं. हिचं मन कधी पवित्र अग्नीच्या ज्वाळांशी एकरूप तर कधी फुलांच्या सुगंधाशी.

लग्न झाल्या झाल्या मंडळी शहराकडे रवाना झाली. त्याला हिचं सागरप्रेम ठाऊकच होतं. घेऊन गेला बीच रिसॉर्टला पहिल्या रात्री.

दोघं बराच वेळ किनारी बसले. तिचा हात त्याच्या हातात. तिचं तादात्म्य सागराशी. कितीदा स्वत:ला सावरत राहिली. आईने सांगितलेलं आठवत राहिली. पण समुद्र कसा सोडणार तिला?

लाटांवर लाटा उचंबळून येत राहिल्या, जणू आठवण देत राहिल्या त्या पहिल्या प्रेमाची. मग ही उठलीच. "चल आत जाऊ" म्हणाली. ताण नकोसा झाला तिला. चेहरा आक्रसला.

याला कळलं बिनसलं काहीतरी ऐन वेळी. दोघं आत आले. एक विचित्र शांतता आणि ताण.

मग तो म्हणाला, "दमली असशील, झोप शांत. अख्खं आयुष्य आहे आपल्याकडे. निश्चिंतपणे झोप." असं म्हणून तो गेला खरंच शांत झोपून. पण हिला अपराधी वाटू लागलं. खिडकीतून बाहेर समुद्राकडे पाहिंलं आणि पहिल्यांदाच केवढी मोठी घोडचूक करून बसलो असं वाटलं तिला.

मीरेला असंच वाटलं असेल राणाजी बरोबर पहिल्या रात्री आणि राधेला दर रात्री?

मीरेची आणि राधेची असहायता आपल्याला नव्हती. नको म्हणता आलं असतं. का नाही म्हटलं? मग आठवलं तिला, त्याच्या डोळ्यात तोच तर अथांग सागर दिसला आपल्याला त्यादिवशी.

पण आता? काय करावं? याच्या आयुष्याची राखरांगोळी का करावी? सूचेना काही.

दुसरे दिवशी परतले. घरी दोघांचे चेहरे पाहून आईच्या छातीत धस्स झालं. पण कोणी काहीच बोललं नाही.

रुटीन सुरू झालं. त्याची नोकरी, हिचं घरकाम. सासूबाई पाहत होत्या सगळंच! साधा ओटा साफ करेल तर असा की चेहरा दिसावा त्यात. सगळ्यात आवडीची जागा म्हणजे गॅलरीतली छोटीशी बाग. हिचे हिरवे हात, पाहता पाहता बागेचा कायापालट झाला. नवनवे धुमारे फुटू लागले, झाडं फुलू लागली. त्याच्याशी, घरच्यांशी वागणंही अतिशय प्रेमाचं. बोलणं तसं कमीच. पण काही करतानाची आपुलकी पोहोचल्यावाचून राहायची नाही.

त्याची मात्र चर्या काळवंडल्यासारखी झालेली. दोघं एकत्र असली की ताण जाणवायचा. कसा सोडवावा हा प्रश्न? अपराधी पणाच्या भावनेने ही ही खंगू लागली.

आईबापांना काळजी पडली.

एकदा संध्याकाळी म्हणाली समुद्रावर जाऊया फिरायला ? तटकन म्हणाला नको. हिरमुसली झाली. चेहरा पडला. बोलली नाही काहीच. यालाच कसंतरी वाटलं. थोड्या वेळाने म्हणाला चल जाऊया. चेहेरा खुलला हिचा. पटकन तयार होऊन आली.

किनाऱ्यावर बसले दोघं. तिला आठवलं, मागच्या वेळी हात हातात घेऊन बसला होता. आज मात्र लांब जाऊन बसला. आता

तिचं समुद्राकडे लक्ष उरलं नाही. अचानक सगळं लक्ष त्याच्याकडे लागलं. त्याची इच्छा नसताना केवळ आपल्यासाठी आला हा.

का केलंस माझ्याशी लग्न? मामीने सांगितलं होतं ना माझ्या बद्दल? आणि मी तरी हो का म्हटलं? मला कळायला हवं होतं! पण तो अथांग सागर दिसला तुझ्या डोळ्यात आणि विरघळून गेले रे त्यात.

मग आता नाही दिसत तो माझ्या डोळ्यात? पाहिलंस कुठे तू नीट ? आणि खरं सांगू? नसेल दिसत तर ओढून ताणून नको शोधूस. दिसेल तेव्हाच ये माझ्यात विरघळायला. वाट पाहेन मी.

अतिशय विद्ध नजरेने तिने पाहिले त्याच्याकडे मग. त्याची आस तिची झाली. पाहात राहिली त्याच्या डोळ्यांतल्या अथांगतेला. कधी विरघळली ना त्याला कळलं ना तिला.

तो ही शिकला मग तिच्याबरोबरीने संपूर्ण एकरूप व्हायला.

अजूनही ही जातेच बनून निसर्गाचा भाग अनेकदा. कधी मटकीच्या मोडांबरोबर आपणही अंकुरते, तर कधी कुंडीतल्या फुलावर बसायला आलेलं फुलपाखरू बनून जाते. पण त्याच्या डोळ्यातला समुद्र ती कायमच असते, बाकी काही झाली तरी.

# ३ संगीत

पंडितजींनी तंबोरा खाली ठेवला. गेले दोन तास त्यांचा रियाज सुरू होता. मनवा त्यांचा रियाज संपण्याची वाटच पहात होती. तंबोरा खाली ठेवल्याच्या आवाजा सरशी ती गरम दुधाचा पेला घेऊन दिवाण खान्यात आली. पेला पंडितजींच्या हातात देऊन तंबोऱ्याला गवसणी घालण्यास तिने सुरवात केली.

पहाटेचा रियाज पंडितजी एकटेच करत. दिवस सुरू झाला की शिकायला येणारे विद्यार्थी, काही कार्यक्रम असला की तबलजींबरोबरचे दुपारचे रियाज, सायंकाळ कार्यक्रम ठरवायला येणाऱ्या लोकांसाठी असे.

ऐन चाळीशीत पंडित स्वरराज यानी चांगलेच नाव कमावले होते. गावी असताना रियाज भरपूर पण कार्यक्रम कमी असत. मग ते मित्राच्या सांगण्यावरून शहरी आले. इथे आल्या आल्या एका खासगी बैठकीत गाण्याची संधी त्याना मिळाली आणि त्यांच्या या गाण्याने बैठक प्रचंड भारावून गेली. लोक वेडावले या सच्चा स्वराने!

कर्णोपकर्णी स्वरराजचे नाव इतरांपर्यंत पोहोचले. मित्राच्या मदतीने विद्यार्थीही मिळाले बरेच. कार्यक्रमही व्हायला लागले. वाहवा आणि पैसा दोन्ही पंडितजींच्या प्रेमात पडल्यासारखे सतत दार ठोठावू लागले.

'मनवा', स्वरराजची पत्नी, स्वरराजच्या वडिलांनी मरणोन्मुख मित्राला दिलेले वचन पाळले व या दोघांचा विवाह झाला. गंमत अशी की गाण्याच्या बाबतीत मनवाला फारशी गती नव्हती. पण गृहकृत्यात अत्यंत दक्ष. आजतागायत स्वरराजांनी तंबोरा खाली ठेवल्यापासून तिसऱ्या मिनीटाला गरम दुधाचा पेला हाती आला नाही असे घडले नव्हते. मनवा मुळातच अबोल, त्यातून स्वरराज सतत गाण्याच्या धुंदीत. दोघांचे नाते बाहेरून पहाण्याऱ्याला कोड्यात टाकणारे असेच होते.

दिवसभरात चारदोन वाक्यांपलिकडे बोलणे होत नसे. दोन पाठोपाठ झालेली मुलगा व मुलगी तर कसे वाढले हे स्वरराजला आठवतही नव्हते. आता दोघेही शाळा संपून पुढच्या शिक्षणाच्या उंबरठ्यावर होते. दोघांचेही गाणे आईवर गेलेले. पण स्वरराजांना त्याची खंतच काय विचार करायलाही वेळ नव्हता मिळाला. स्वत:च्याच गाण्यात ते मश्गुल होते.

मनवाला शहरी आल्यापासून तर क्षणाची उसंत मिळत नव्हती. घरातला राबता इतका वाढला होता की नोकर माणसं ठेऊनही तिला क्षणाची फुरसत मिळत नव्हती.

अलिकडे गाण्याच्या मैफिलींना तिनेही चलावे असा स्वरराजांचा आग्रह असे. ती त्यांचा शब्द कधीच मोडत नसे. पण हळू हळू तिथे नटून थटून येणाऱ्या सुंदर स्त्रिया व शहरी संगीतप्रेमी यांना देखणे स्वरराज व त्यांची ही साधीसुधी, गाणं न कळणारी पत्नी यांच्यात फारच विजोड आहे असं वाटू लागलं. स्वरराजचे जवळचे मित्र तसं सुचवू लागले.

मग एक दिवस जेवण झाल्यावर स्वरराज पत्नीस म्हणाले "तुला गाणं मुळीच नाही का गं आवडत?"

मनवा म्हणाली "कळला नाही तरी देव नावडतो का कुणाला?"

"मग समजून पण घे ना. अधिक आवडेल" मनवा फक्त हसली.

मग अधून मधून स्वरराज तिच्याशी निरनिराळे राग, त्यातले खास बारकावे, कुठला स्वर कोमल, कुठला तीव्र, आरोहात

कोणते, अवरोहात कोणते, कोणता राग कोणत्या वेळी गायचा, राग व त्यातील भाव वगैरे बोलण्याचा प्रयत्न करू लागले.

मनवा ऐकून घेई सगळंच पण तिचं मन त्या तांत्रिक माहितीत मुळीच रमत नसे. पंडितजींच्याही ते लक्षात येई. मन खट्टू होई. बाहेर मंडळी आपली काहीशी कीव करतात बेसूरी बायको मिळाली म्हणून असा कयास होता त्यांचा.

मनवाच्याही लक्षात येई त्यांचे खट्टू होणे. पण बनावटी बोलणे, वागणे तिच्या स्वभावातच नव्हते. ती तरी काय करणार. खोटा खोटा आवेश कसा आणणार?

काहीसा तणाव निर्माण झालाच होता त्यांच्यात यामुळे. दिवस जात होते. पंडितजींच्या गाण्याचे चाहते वाढत होते. स्वरराजाना इतरांनी मनवाला कमी लेखले की टोचत होते. महफिलीनंतर हिरहीरीने त्याच्या गाण्यातील तांत्रिक बाबींवर चर्चा करणाऱ्या सुसंगीत स्त्रिया पाहिल्या की त्यांच्याशी नकळत मनवाची तुलना त्याचे मन करू लागे. 'ही' का नाही शिकत असं बोलायला? असंही वाटे.

पण मनवाला काही फरक पडत नव्हता. ती घरी महफिल असेल तर अत्यंत काटेकोरपणे येणाऱ्या व्यक्ती कोण, त्यांच्या आवडी निवडी, यांचा बारीक विचार करून सर्व जय्यत तयारी करून ठेवी. नोकर चाकर ही इतके उत्तम तयार केले होते तिने की ऐन महफिलीच्या वेळी तिची मेहनत कुठेच दिसू नये, असं वाटावं की सगळं परस्पर आपोआप घडतंय. बाहेरच्या महफिलींमधेही इतर गायक गायिकांसाठी त्यांच्या आवडीच्या भेटवस्तू बिनबोभाट त्यांच्यापर्यंत पोहोचत. स्वरराजनेच दिल्या असं समजून त्यांनाच धन्यवाद देत.

पंडितजींच्या पहाटेच्या रियाजाच्या वेळेस मनवा आतल्या खोलीत बसून राही. रोज.

त्या दिवशी पहाटेही लवकरच होणाऱ्या खास महफिलीचाच विचार स्वरराजांच्या मनी होता. सुरवातीचे काही राग, तराणे, बंदिशी गाऊन झाल्यावर गरम पाण्याच्या पेल्यातून घोट घेऊन पंडितजीनी भैरवी सुरू केली. कितीतरी वेळ ते नुसती सुरवातीची सुरावटच आळवत होते. त्यातच इतके तल्लीन झाले की काळावेळाचं भानच नाही उरलं . आर्त स्वरधारा वाहू लागल्या आणि पाहता पाहता  मनवाच्या डोळ्यातून अश्रुधारा! एक क्षण असा आला की आपण काय करतोय याचे भान न राहवून ती झर्कन

उठून बाहेर आली व काही समजण्यापूर्वी तिने स्वरराजांच्या तंबोऱ्यावर फिरणाऱ्या बोटांवर आपला हात ठेवला. गाणे थांबले, मिटलेले डोळे खाडकन उघडले, आणि आपण काय करून बसलो याचे तिला भान आले.

गाणाऱ्या पंडितजींना थांबवणे म्हणजे केवढा घोर गुन्हा! झट्कन हात मागे घेतला. "मा..माफ करा म..ला, कळलंच नाही काय करतेय.. इतके दिवस ही सुरावट ऐकतेय पण आजची ही आर्तता .. सहन नाही हो झाली मला.. आत आत तुटत गेलं काहीतरी.. तुमच्याही आत तुटतंय काहीतरी जाणवलं मला.. जन्मभराचं आर्त होतं त्या स्वरात.. माफ करा मला.. तुमच्या समाधीत विघ्न आणलं मी.. पण कुठून आलं हे असं आर्त तुमच्या स्वरात हा विचार छळतोय मला.."

कित्येक दिवसांचं कोडं सुटलं जणू पंडितजींच्या मनातलं. गदगदून भरलेल्या आभाळानंतर मुसळधार पाऊस पडून जावा आणि धरा स्वच्छ ताजी तवानी व्हावी तसं झालं त्यांचं मन.

मनवाचा तोच हात हाती घेतला त्यांनी.. म्हणाले आज खरी दाद मिळाली .. आज खरा गायक झालो.. इतके दिवस तुला काही

गाण्यातलं समजत नाही असा बालीश विचार करायचो, पण तुला कळणारं गाणं मलाच गाता येत नव्हतं गं.

आज लागला तो खरा स्वर, आणि थेट पोहोचला तुझ्यापर्यंत.. धन्य झालो मी. आता महफिलीची चिंता नको.

मनवाला काय बोलावं कळेना... बिचारी पाहत राहिली आपल्या आराध्याकडे एकटक.  पण मळभ स्वच्छ झालं होतं हे तिलाही उमगलंच!

# ४ चंद्रिका

ती सकाळी जरा उशीरानेच उठली. दात घासत गॅलरीत आली. सगळी चाळच आळसावलेली. कोणी अजून साखरझोपेत, रात्रीच्या श्रमांनी मोडून आलेली अंग दुमडून रजईत पडलेली. हवा तशी गारच पडली आज.

गॅलरीत पत्र्याच्या खालच्या वाशाला टांगलेल्या पत्र्याच्या डब्यातल्या तुळशीला तिने पाणी घातलं आणि चहाचं आधण चढवलं.

चहाचा घोट नरड्याखाली गेल्यावर मात्र तरतरी आली तिला. चहा पोटात जाताच निसर्गाच्या हाकेला ओ देत डब्बा घेऊन खाली उतरली. नशीबाने एक दार मोकळं मिळालं . मग वर येऊन आंघोळ करून उठवलं तिने पोराला.

“चल रे, उठ, उशीर होईल.”

मग फरफऱ्या स्टोव्हला पंप मारून एकीकडे इडलीचा कुकर, वातीच्या स्टोव्हवर चपात्या, भाजी, चटणी, सांबार, बघता बघता झालं सगळं. डबे भरले, पोराचे, आपले.

इस्त्री लावून त्याचे कपडे प्रेस केले.

परत पोराला हाकारला. तसा तो उठला. त्याची झोपही अर्धवट व्हायची. लहान वयात अजून झोप हवी मिळायला. पण इलाज नव्हता.

स्वच्छ पण मळखाऊ रंगाची साडी, घट्ट आंबाडा, काचेच्या दोन दोन बांगड्या, आणि गळयात काळ्या मण्यांचं डोरलं. चंद्रिका तयार झाली.

त्याला गरम पाणी दिलं आंघोळीला. चहा चपाती खाऊन दोघं बाहेर पडले. दोघांच्या खांद्याला भल्या थोरल्या पिशव्या.

भराभर चालत स्टेशनवर आले. रेल्वे पोलिसाने हटकलेच. एक नोट त्याच्या मुठीत सरकवून निघाली. ८.३३ ची लोकल. लोकलला गर्दी होतीच. लेडीज डब्यात शिरली.

“आली बघ!”

“ए, इकडे दे गं आधी.” तिसऱ्या कंपार्टमेंटमधून आवाज आला तशी भराभर तिकडे गेली. पोराला दुसऱ्या कंपार्टमेंटवाल्यांनी मागितलं तसा तो तिकडे गेला.

सराईतपणे डबे उघडून प्लास्टीक कंटेनरमधे इडली सांबार, वर शेव, छोट्या बंद डब्यात चटणी, चमचा. खाली प्लास्टीक थाळी. बायका खुश असायच्या हिच्यावर. भराभर सगळ्यांना देऊन परत

मागे आली. मुलगाही तयारीने देत होता. बायका कौतुकाने पाहायच्च्या. आवर्जून हिच्याकडूनच घ्यायच्च्या.

पाहता पाहता माल खपत होता.

तिने परत थैली फिरवली उष्टी भांडी गोळा करायला.

"काय गं, काय करतेस यांचं? परत तीच नाही ना वापरत? "

"नाही नाही मॅडम. खाली उतरल्याबरोबर डस्टबीनमधे टाकते. या मॅडमना विचारा ना, त्या उतरतात माझ्याच बरेबर."

"हो गं, रोज पाहते ना मी. स्वच्छ आहे स्वत:ही. त्यामुळे घेतो आम्ही रोज. रोज वेगळा असतो पदार्थ!"

रोजचं स्टेशन येईपर्यंत पैसे गोळा करून झाले.

दोघं उतरली. परत पुढची लोकल. सगळा माल संपला. दोघं दुपारपर्यंत घरी आली.

येता येताच जमलेले पैसे बॅंकेत भरले तिने.

"अगं एकदम आठवड्याचे भर की. तुझंही आणि माझंही, काम कमी होईल."

"मॅडम, घरी नेले की पाय फुटतात हो पैशांना. पोराच्च्या शिक्षणासाठी जमायला हवी ना मोठी रक्कम." ती अजीजीने बोलली.

आल्यावर मुलाला वाढून तीही जेवायला बसली. मग त्याला अभ्यासाला बसवून ती उद्या सकाळच्या तयारीत गुंतली.

शाळेचा अभ्यास करून मुलगा तिथेच झोपून गेला. ती ही जरा आडवी झाली.

रस्त्यावरून गजरेवाल्याच्या सायकलच्या घंटेच्या आवाजाने बरोबर जाग आली.

चहाबटर खाऊन , डबा घेऊन मुलगा रात्रशाळेत जायला निघाला. तासभर लोकलचा प्रवास. शेजारपाजारची मिळून सात आठ  मुलं असंत. रात्री शेवटच्या लोकलने परत येत. लोकल कारशेडमधे जायची. पोरं चढल्याबरोबर  झोपून जायची नी पहाटे लोकल परत फलाटावर आली की मग उठून घरी यायची. रोजचाच शिरस्ता.

मुलगा गेल्यावर मात्र तिने मस्त परत एकदा चहा घेतला करून. जरा खाऊनही घेतलं.

खोली आवरली. गजरेवाल्याने मगाशीच नेम धरून गॅलरीत भिरकावलेली फुलपुडी आत आणली.

पाणी गरम करायला ठेवलं. गरमागरम पाण्याने सुवासिक साबण लाऊन तिने सचैल स्नान केलं.

मॅचींग पेटीकोट मॅचींग ब्लाऊज घालून आरशासमोर बसली. केसांचा लांब शेपटा घातला. अर्थातच गंगावन लावून, एक बट कळत नकळत पाण्याचं बोट लावून तिने वळवली. मग गजरे माळले. चेहऱ्याला क्रीम फाऊंडेशन, पावडर, ओठांना लिपस्टीक. आधीचेच मोठे डोळे काजल पेन्सीलने टपोरे दिसू लागले. भिवया रंगवल्या. मोठी बिंदी लावली कपाळावर. जरीवर्क ची साडी नेसून चमचमता पदर दोन्ही खांद्यांवरून ओढून घेऊन तिने अत्तर लावले.

देव्हाऱ्यातल्या शंकराच्या तसबिरीला हार चढवला. उदबत्ती लावली. दिवा लावला. हात जोडून, डोळे मिटून, या देवदासीने प्रार्थना केली. “ हे प्रभू, आजची माझी सेवा स्वीकार करा! लहानपणी आईकडून मिळालेला वारसा, तिने दिलेली श्रद्धेची शिकवण ती मनोभावे पाळत होती. फुलपुडीतली सुवासिक फुले तिने गादीवर अंथरलेल्या स्वच्छ चादरीवर पसरली.

ती सावकाश गॅलरीत आली. तिच्या नेहमीच्या खुर्चीत बसली. खालून जाणाऱ्या इच्छूक ग्राहकांना ती दिसत होती, एखाद्या नववधूसारखी. आजच्या आपल्या देवाला सर्वस्व अर्पण करायला ती तयार होती.

देव्हाऱ्याखालचा मोठा लाकडी खोका नोटांनी तुडूंब भरला होता. पण ते पैसे मुलाच्या शिक्षणासाठी वापरणं या आईला मान्य नव्हतं!

काही माणसं हे एक वेगळंच रसायन असतं हेच खरं!

## ५ गण्या, मनी आणि जांभूळ

गण्या जागा झाला दचकून, घंटेच्या आवाजाने. क्षणभर कळेना त्याला, कुठे आहे ते! मग हळूहळू जाग आणि आठवण एकत्रच आली.

काल संध्याकाळी पोलीस त्याला इथे सोडून गेले.

‘बा नं टांगलं सोत्ताला, आन् दोन दिसांनी आय पोलीस ठेसनात, मंदी आनी मला घिऊन ग्येली. आजाचा तिनं मुडदा पाडला शेतात, आसं म्हनली. समदं सांगितलं. पोरांना बगनारं कुनी न्हाय म्हनली. आयेला आता कुटं न्येलं काय म्हाईत. मंदीला पोरींच्या रिमांडात धाडनार हुते. मला हितं सोडलं. पन माजी मनी ऱ्हायली तितंच! आनि जांबळाचं झाड बी. त्येना कसं आननार ? बा, आजा, म्येले, आय पोलिस ठेसनात. मंदी आनि मी रिमांडात. घरला कोनीच न्हाय. मनी म्यॅव म्यॅव करत सोदत आसंल. आनि जांबळाला तर बोलताबी येत न्हाय. बोलता येत आसतं, तर बा नं टांगलं सोत्ताला, तवा आवाज दिला नसता व्हय त्यानं?’

“ए, उठ रे. येळ संपली की आंगोळ नाय करायला मिळायची. घंटा ऐकलीस का नाय?”

गण्या पट्कन उठून बसला. सगळी मुलं भराभर कपडे घेऊन निघाली होती. गण्याकडे काहीच नव्हतं. तो तसाच सगळयांच्या मागून निघाला. मुलं प्रातर्विधीच्या रांगेत उभे राहून तिथलं काम उरकून आंघोळीच्या रांगेत उभे राहत होते.

एक मोठा नळ उंचावर बसवलेला. एक माणूस जरा मागे उभा राहून शिटी वाजवायचा. शिटी वाजली की नळाखालचा मुलगा बाहेर, रांगेतला मुलगा नळाखाली. साधारण तीन मिनिटांनी पुढची शिटी.

गण्या पाहत बसला. सगळयांचं झाल्यावर त्या माणसाने एक कपड्याचा जोड, एक टॉवेल,एक प्लेट, एक मग , गण्याच्या हातात दिला.  गण्याला नळाकडे जाण्याची खूण करून नळ सुरू केला. गण्या नळाखाली उभा राहिला. तीन मिनिटांनी नळ बंद झाला.

घरी विहिरीवर किंवा ओढ्यात मनसोक्त डुंबून आंघोळ व्हायची. आता ते बदललं.

सगळी मुलं आता एका रांगेत बसली. वाढपी चहा पाव घेऊन आले. प्रत्येकाच्या मगात चहा ओतून पाव प्लेटीत टाकत निघाले. त्यांच्या हालचाली अगदी यंत्रवत होत्या. भरभर! प्रत्येकाच्या मगात पडणारा चहाही बरोबर तेवढाच. गण्याला पाहत राहावसं

वाटलं ते सगळंच. मग त्याच्याही पुढ्यात चहा पाव आला. तो मन लावून चहा पाव खायला लागला.

थोड्या वेळानं हाजरी झाली. पोरं तिथल्याच वर्गांमधे गेली. हाजरीवाल्यानं गण्याला थांबवून घेतला.

"नाव?"

"गण्या." त्याने आपल्याजवळचे कागद तपासून त्याचं पूर्ण नाव लिहीलं.

"शाळेत जात होतास गावी?"

गण्याने नकारार्थी मान हलवली.

वर्ग: 'पहिली'लिहीलं.

मग एक पत्र्याची पाटी, पेन्सील, एक अंकलिपी मिळाली. गण्या हरखलाच ते बघून.

जा पहिलीच्या वर्गात जाऊन बस.

गण्या पाहत राहिला. मग तोच उठला. गण्याच्या दंडाला धरून पहिलीच्या वर्गात घेऊन गेला. मास्तरांना सांगून बसवलं त्याला तिथे.

शाळेतलं काही गण्याला कळलं नाही. तो नुसताच पाहत बसला. मग पाटीवर त्याने जांभळाचं झाड, त्याला आठवत होतं

तसं काढलं. अचानक त्याच्या डोळ्यांसमोर एका फांदीला बा लटकला होता ते आलं. त्याने तेही आठवेल तसं काढलं. कोणीतरी चुगली केली. मास्तरांनी पाटी पाहिली आणि खाड्कन बसली गण्याच्या मुस्काटात. त्याला कळलंच नाही का मारलं. तो नुसताच गाल चोळत बसला. "एवढ्याशा वयात ही खुनशी वृत्ती!" मास्तर ओरडत होते. "कोणाला लटकवायचय रे तुला? कोण आहे हा?"

"माजा बा! लटकला त्यो आपनहूनच! दारातल्या जांबळावर!" गण्या सत्य सांगता झाला. मास्तर एकदमच गप्पं झाले. काही न सुचून त्यांनी गण्याची पाटी पुसून त्याच्या हातात दिली. त्याच्या खांद्यावर हात ठेवून, बस म्हणाले. गण्याला ते ही काही कळलं नाही. तो बस म्हटल्यावर बसला.

शाळा संपल्यावर दुपारी परत तशीच रांग. यावेळी रोटली आणि डाळीचं कालवण. गण्याला तेही आवडलं. 'घरला मिळाली तर भाकर, ती बी पान्यासंगट, फार जालं तर मीटाचा खडा., हितं मजाय की. मंदीला बी मिळत आसंल का आसंच? आनि आयला? मनी आसती तर तिलाबी मी माज्यातला टुकडा दिला आसता."

जेवणं झाल्यावर मुलांना निरनिराळी कामं होती वाटून दिलेली. भांडी घासायला, जमीन पुसायला, अंगण झाडायला,

बेडशीटं चादरी धुवायला, ज्याचा त्या दिवशी जो कामाचा वाटा होता ते काम तो करू लागला.

गण्या सगळ्यात लहान होता. तिथल्या माणसाने त्याला माळ्याकडे पाठवलं. “माळीबाबा, या पोराला द्या काही काम.”

नवीन रोपं आणलेली,लावायची होती, त्यात मदत करायला सांगितली माळ्याने.

अगदी लहान लहान रोपं एकत्र होती. माळ्याने लहान लहान पिशव्या खताने भरायला दिल्या गण्याकडे. मग एक एक रोप वेगळं करून त्या पिशव्यांमधे लावायला सांगितलं. “मंग उलीसं पानी घालाचं लावून जाल्यावर म्हंजी रुजंल रोपटं, काय?”

गण्याने मान हलवली. पिशव्या भरून तो एक एक रोप लावू लागला. एक रोप हातात घेतल्यावर त्याला वेगळाच ओळखीचा वास आला. त्याने परत परत हुंगला. त्याचे डोळे चमकले. तो निरखून पाहू लागला त्या रोपाला. ओळख पटलीच!

पहिल्यांदाच तो कोणी  न विचारता बोलला,”ह्ये जांबळाचं हाय न्हवं? “

माळ्याने वळून पाह्यलं. “व्हय. ओळकलास की बरूबर! हाडाचा माळी हाईस म्हनायचा. मोटं कर त्येला आता. मंग जिमीनीत लावू.”

गण्या किती तरी वेळ त्या रोपट्यावरून मायेनं हात फिरवत राहिला. “त्येचं जांबळाचं झाड त्येला सोदत आलं व्हतं. आता मनीबी येनार!” त्याची खात्रीच पटली.

तो थांबणार होता इथेच आता तिची वाट पाहत.

गण्याचं सगळं जग पुरं होणार होतं,मनी आल्यावर.

तो रिमांडमधे पुरता रुजणार होता आता, त्या जांभळाच्या रोपासारखा!

“बरं जालं आयनं आजाचा मुडदा पाडला!” तो मनात म्हणाला.

# ६ नि:शब्द

लाजाळूची पानं एक एक करत मिटत गेली सईच्या नाजूक बोटांच्या स्पर्शाने. मिटता मिटता त्यांच्या कडून आलेली आनंदाची लहर सई आणि तिच्या अवती भवती रुंजी घालणाऱ्या इवलुशा पिवळ्या फुलपाखरापर्यंत पोहोचली. फुलपाखराचे पंख किंचित वेगाने फडफडले आणि सईच्या गालांवरची खळी अधिक खोल झाली.

दंग्या बाजूलाच झोपलेला. ती लहर तशीच पुढे त्यालाही स्पर्शून गेली आणि जराशी मान उचलत त्याने शेपूट हलवली.

मग सईने हळूच गवतफुलाला कुरवाळलं आणि परत एकदा तशीच आनंदी लहर वाऱ्यालाही सोबत घेवून सभोवतालच्या झाडा पानांवर अलगद पसरली. हलकेच पानांच्या टाळ्या वाजवून त्यांनी तो आनंद व्यक्त केला.

सई, आनंदी बाईंची पाच वर्षांची पोरकी नात. मुलगा व सून यांच्या कारला झालेला अपघात, सुनेची वेळेपुर्वी झालेली डिलीव्हरी, पतीपत्नीचा लगेचच झालेला मृत्यू, व साठीत पदरी

आलेलं हे गोंडस बाळ! सारं काही इतक्या झपाट्यात घडलं की कित्येक दिवस त्यांचा घडलेल्या घटनेवर विश्वासच बसेना.

पण जितं जागतं चैतन्य पदरी असताना गेलेल्यांचा विचार करत बसणं आनंदीबाईना शक्य नव्हतं. निवृत्त आयुष्याची ठरवलेली रुपरेखा पार उलटी पालटी होऊन गेली.

हळू हळू कमी दिवसांची जन्मलेली सई (हे नाव मात्र मुलगी झाली तर ठेवायचं असं त्यांच्या मनात आधीपासूनच होतं) अतिशय वेगळं बाळ असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. डॉक्टरी तपासण्या झाल्यावर तिला जन्मत:च झालेल्या अपघातामुळे पूर्ण बहिरेपण आहे व ते दुरुस्त होऊ शकणार नाही हे कळल्यावर त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. बाकी मेंदुला आता तरी काही इजा दिसत नव्हती. पण तिची बुद्धीमत्ता कितपत विकसित होईल याविषयी डॉक्टरांच्या मनात शंका होती. आपल्यामागे या पोरीचं कसं होणार या विचाराने त्यांचं मन सैरभैर झालं.प्रथमच त्या परमेश्वरावर रागावल्या. “माझा मुलगा, सून नेलेस , मी एका शब्दाने तुला दोष दिला नाही. त्यांचे व माझे प्रारब्ध, असे समजून पदरी आलेलं तुझं हे देणं प्रसाद समजून स्विकारलं. पण आता मात्र तुझी शंकाच येतेय रे बाबा. वयाच्या शर्यतीत मी या पोरीच्या सहा दशके

पुढे , तुला थोडाही विचार करावासा नाही का रे वाटला? कसं आयुष्य जगावं हिने पुढे? श्रुती काम करत नाही म्हणजे वाचाही बंद. अश्राप जीवाने कसं जगावं माझ्यानंतर? दुसरं कोणी नात्याचं नाही. माझ्या या शेताच्या घरापासून शेजारही कोसभर दूर! करावं तरी कसं?"

सई दिसामासाने वाढू लागली. तिच्या चेहऱ्यावरचं दैवी स्मितहास्य फारसं कधी विरलं नाहीच. निसर्गाच्या कुशीत हे बाळ त्यातलाच एक घटक बनत गेलं . आनंदी बाईंच्या लक्षातही ही गोष्ट यायला ही वर्ष गेलं तिच्या जन्मानंतर.

एकदा सईला अंगणात चटईवर ठेवून त्या काही वाचत बसल्या. कसा कोण जाणे अचानक दंग्या जोरजोरात भुंकू लागला. चिमणी ही जरा कर्कश आवाजात ओरडतेय असा भास त्यांना झाला. नकळत त्यांचे लक्ष सई कडे गेले पहातात तर एक मोठा विंचू सईच्या अगदी पायाजवळ आलेला. बाईंनी झट्कन सईला उचलले. विंचू त्याच्या मार्गाने निघून गेला. दंग्या भुंकायचा थांबला. चिमणी ही शांत झाली.

मग त्या लक्षपुर्वक पाहू लागल्या. सई ने दुडू दुडू पावले टाकत झाडाकडे जावे आणि झाडाची फांदी अलगद सईकडे झुकावी.

फुलाने आपली मान वळवून तिच्याशी गुज करावे आणि सईची खुदकन खळी खोल व्हावी.

कधी एखाद्या पक्षाने सरळ सईच्या हातावर येवून बसावे. रंगीत पंख फडफडवून तिचे मनोरंजन करावे. वाऱ्याने मंदपणे वाहून तिला जोजवावे. तिनेही त्या अलवार झोक्यांवर गुंगत झोपून जावे.

तिचे पाऊल पडण्यापुर्वीच गवताच्या पात्याने हळूच एका बाजुला झुकून आपली टोकदार धार कमी करावी.

बाई विचार करू लागल्या. जर ही झाडे, पाने, फुले, पक्षी, प्राणी, बिनाआवाज हिच्याशी संधान बांधू शकतात तर मी पण करू शकेन, शकेन का?

मग प्रयत्नपुर्वक त्याही सईशी आंतरिक संवाद करण्याचा प्रयत्न करू लागल्या. जसं त्यांना तिला जवळ बोलवायचं असल्यास त्या भावनिक पातळीवर ती जवळ आल्याची भावना मनी निर्माण करत. सुरवातीला सवयीने मनी शब्दच उमटे पटकन आणि मग संधान बांधलं जायचं नाही. हळू हळू शब्दांना तडीपार केलं त्यांनी. हळू हळू फक्त भावना, शुद्ध भावना उमलू लागल्या आणि मग सई चं आणि त्यांच संधान नीट जुळू लागलं.

सई निसर्गाच्या कुशीत प्राण्यांच्या पक्षांच्या, वृक्ष वल्लरींच्या समवेत हुंदडत बागडत मोठी होत होती. प्राणी पक्षीही एकमेकांशी त्यांच्या खास भाषेत बोलतात. पण जणू हिच्याबरोबर ते ही सगळे मूक आंतरिक संवाद करायला शिकले होते.

आता तिचं असं खास अनोखं, नि:शब्द अथांग जाणिवांनीच फक्त भरलेलं जग तिच्यासाठी अस्तित्वात आलं होतं.

पुढे काय हा विचार आनंदीबाई चुकून जरी मनी आला तरी हद्दपार करू पाहत कारण आता तेही सई पर्यंत पोहोचू लागले होते थेट.

विचार कळला नाही तरी काळजीची भावना तिच्यापर्यंत पोहोचत होती. ती अशा वेळी सैरभैर होऊन त्यांच्याकडे पाहू लागते हे त्यांच्या लक्षात आले होते.

एकदा माकडांची एक टोळी शेतावर आली. जवळपास दहापंधरा माकडांची टोळी. माकडं, माकडिणी, त्यांच्या पोटाशी पिल्लं. या झाडावरून त्या झाडावर. कधी अंगणापर्यंत ही यायची ही वरात.. परत ची ची करत उड्या मारत झाडांवर. एक धिटुलं तर पार पायरीपर्यंत आलं. आनंदीबाईंना काळजी वाटली, नुकतीच केळींची बाग उतरवून कंत्राटदार मार्केटमधे गेला होता घेऊन, नावाला काही घड शिल्लक होते, माकडांनी त्यावरच ताव मारला

होता. पण आता पायरीपर्यंत आली म्हटल्यावर त्या जरा काळजीत पडल्या.

सई मात्र हसत होती. हात पुढे करत होती. ते धिटुलं ही मग पुढे आलं , सईचा हात धरून हळूच तोंडाने चाटू लागलं. सईला गुदगुल्या झाल्या. ती अधिकच हसू लागली. काही अंतरावरून धास्तावलेल्या आनंदीबाई, आणि अंगणातून त्या धिटुल्याची आई , सावध पवित्र्यात एकमेकींचा अंदाज घेत उभ्या होत्या.

ते सईला चावलं तर ही काळजी आनंदीबाईंना वाटत होती. माकडिणीलाही आपल्या बाळाला इजा करेल का ही? असंच वाटत असावं.

पण तेवढ्यात त्या धिटुल्याने एक कोलांटी उडी मारली नी ते आपल्या आईकडे गेलं. आनंदीबाईंची काळजी सईपर्यंत पोहोचली होतीच, ती ही मग त्यांच्या जवळ येऊन उभी राहिली.

सईने सुपातल्या भुईमुगाच्या शेंगा उचलल्या व ती त्या माकडिणीकडे पळत सुटली, भेदरून माकडीण आधी उड्डाणाच्या पवित्र्यात सज्ज झाली पण नंतर सईची इच्छा तिच्याहीपर्यंत पोहोचली असावी, ती थांबली, तिने त्या धिटुल्याला आपल्या पोटापासून सोडवून समोर ठेवले , ते ही मग लुटूलुटू चालत सईसमोर येऊन बसलं. सईने शेंगा समोर ठेवताच काही उचलून

परत आईकडे पोबारा केला. मग हळू हळू सावध पणे माकडीण पुढे आली. तिने शेंगा उचलल्या व मग मात्र पिल्लाला घेऊन ती दूर गेली.

सई हसत हसत त्या दोघांकडे पहात बसली. आणि आनंदीबाई भरल्या डोळ्यांनी तिला...

आज एक गोष्ट त्या कळून चुकल्या होत्या. निसर्गाकडून सई ला कसलाही धोका होण्याची शक्यता नव्हती!!!!

श्रुती आणि वाचा जरी काम करत नसले तरी अथांग जाणीवांनी भरलेला हा निसर्ग सईला पुरेसा होता !

# ७ न दिली वचने

”तू तेव्हाही मला आवडायचास जेव्हा माझं असणं तुझ्या गावीही नव्हतं. कित्ती मुली घोळका घालायच्या तुला. कॉलेजचा हीरो होतास तू ! नाटक, गाणं, सगळीकडे तुझंच नाव. अभ्यासातही हुशार. प्रोफेसर्स पण फॅन होते तुझे. मी लांबूनच पहायची तुला. वाटायचं एक नजर तरी टाकावीस माझ्या दिशेने. नुसता लांबून दिसलास ना, तरी एक ठोका चुकायचा माझा. तुला मात्र तेव्हा माझी खबरबातही नव्हती. तू कायम त्या हायफाय मुलींच्या गराड्यात.”

“वेडी की खुळी तू? त्या ‘भावल्या’ कधीच नाही भावल्या मला. तू वेगळीच होतीस सगळ्यांपेक्षा. दिसायलाही, आणि वागायलाही. लांबसडक वेणी चालताना अशी काही तालात हलायची की कलेजा खल्लास. एक ठहराव होता तुझ्यात. तुझ्याकडे सरळ सरळ पाहण्याची हिम्मत नव्हती कोणाची. माझीही. एक प्रकारचा आब होता तुझ्यात. तुझे बोलके मोठे डोळे म्हणजे तर.. चुकून नजरेला नजर भिडली तर त्या खोल खोल निळ्या काळ्या डोहात बुडून परत वरच येऊ नये असं वाटायचं.”

“इश्श्य! काहीतरीच!”

“अहा! किती छान लाजता येतं गं तुला.”

“तरी कित्ती दिवस घालवलेस नुसतं बोलायलाही? मग एक दिवस मीच बोलले धीर करून. फोन नंबर मागितला तर तो ही देताना किती विचार केलास.”

“छे गं, मी ना पुरता बावचळूनच गेलो होतो. मनात माझ्याही होतं, तुझ्याशी बोलावं, परत भेटीसाठी काही मार्ग शोधावा. पण मी काही बोलण्या आधी  तूच  बोललीस आणि मी काय बोलावं न कळून गोंधळलोच.”

“मग मीच एका कागदावर माझा नंबर लिहून दिला. कसाबसा घेतलास कागद, आणि निघून गेलास. नंतर किती दिवस टाळायचास मला.”

“हो पण मग मीच फोनही केला ना काहीच दिवसांनी. घाबरट होतो गं. कमिटमेंटची भिती वाटायची मला.”

“नशीब, केलास फोन त्यादिवशी. नसता केलास तर? पुढं एवढं रामायण घडलच नसतं म्हणा!”

“पण त्यानंतरचे उरलेले काही महीने मात्र मंतरलेले होते.”

“हो ना, ते लांब सगळ्यांना चुकवून बाईकवरून भटकणं, कटींग चहा दोघात एकच कप घेऊन पिणं, पावसात भिजणं आणि खुळ्या रोमॅंटीक कविता लिहीणं, जगातली सर्वोत्कृष्ट कविता आहे

ही असं वाटणं, रात्री रुमवर आल्यावर परत आपल्या गप्पा आठवून गालातल्या गालात एकटच हसणं, मैत्रिणींनी चिडवणं."

"मित्रांनी तर मला वाळीतच टाकलं काही दिवस. 'काय लेका गळाला लागलास' म्हणाले. पण त्यांच्या नजरेतली सरळ सरळ असूया सुखावून जायची मला. आपण अख्ख्या जगाचे राजे आहोत असं वाटायचं तू बाईकवर मागे बसल्यावर."

"मग परीक्षा झाल्या आणि आपण परतलो आपापल्या गावी. त्यानंतर तू गायबच झालास. ना मेल, ना पत्रं, ना फोन. माझे फोनही उचलेनास. नेहमी कोणीतरी दुसरच उचलायच, आणि मग मला ठेऊन द्यायला लागायचा. तेव्हा काही मोबाइल फोन नव्हते ना आत्तासारखे. मेललाही उत्तर नाही. मी आशाच सोडली होती. आईबाबा लग्नासाठी मागे लागले होते. तुझा काही पत्ताच नव्हता. तुझ्या मनात काय आहे ते ही कळत नव्हतं. काय सांगणार होते मी घरी? मला विसरलास असंच वाटलं मला. "पण मी तुझाच," असं वचन दिलं होतस त्याचाच एक आधार होता मनाला."

"अगं, आजारी नाही का पडलो गेल्या गेल्या. ताप इतका की सतत ग्लानीतच असायचो. मग वीकनेस प्रचंड. जरा बरा झाल्या झाल्या तुला फोन केला."

"पण तरीही अडचणी काय कमी आल्या का?"

“इकडे मी तुला फोन केला, आणि तिकडे बाबा त्यांच्या मित्राला शब्द देऊन आले की तुझ्याच मुलीला सून करून घेईन. त्यांचे व्यावसायिक संबंध गुंतले होते ना! मग सुरू झाला आपला संघर्ष. तुझा तुझ्या घरच्यांशी, माझा माझ्या.”

“तुझ्या आणि माझ्या घरच्यांचं वागणं त्यांच्या दृष्टीने बरोबर होतं रे. तुझी आर्थिक सुबत्ता, आमची सर्वसाधारण परिस्थिती. मिसमॅच वाटत होतं त्यांना आपलं नातं.”

“मग आपण पळून जायचं ठरवलं घरातून. पटत नव्हतं , पण इलाजही नव्हता.”

“हं!” चहा टाकू?”

“नको. बस अशीच जवळ. बोलुया.”

“बरं”

“आपल्या दोघांजवळ मिळून अवघे २००० रुपये होते .कुठे जायचं, काय करायचं काही माहीत नव्हतं. ना नोकरी होती, ना घर. किती बालीश निर्णय होता तो.”

“हं! ह्रदयाने निर्णय घ्यायचं वयच होतं आपलं. खरच! निघून २४ तासही नव्हते झाले तर तुझे वडील पोलीस घेऊन आले. सोबत माझेही बाबा.”

"हं! क्षणात होत्याचं नव्हतं झालं. त्यानंतर घरच्यांचा विश्वास गमावला आपण."

"मला तर घरातून बाहेर पडायचीही बंदी होती. अगदीच कुठे जायचं तर बाबा, किंवा आई बरोबर यायचे. काहीच दिवसात लांब उत्तरेत राहणाऱ्या मावशीकडे रवानगी केली माझी. तिच्या दिराच्या ओळखीने एक स्थळ आलं. मुलाला लग्न करून लगेच परदेशात जायचं होतं. त्याला घाई होती, यांना माझी अडचण होत होती. 'चट् मंगनी पट् ब्याह' करून मोकळे झाले.

तो खूप प्रॅक्टीकल होता. मला सर्व कल्पना दिली त्याने. परदेशात सगळी कामं हातानेच करावी लागतात. ती तयारी हवी. माझी फारशी मदत होणार नाही हे ही सांगितलं. मला विचारलं "तुला परदेशात रहायला आवडेल का?" मी नुसतीच मान हलवली. धड हो नाही धड नाही नाही. त्याने हो अर्थ घेतला. आवडले होते ना मी त्याला."

"हं! का नाही सांगितलस, माझं दुसऱ्या मुलावर प्रेम आहे?"

"कसं सांगणार? तुझ्या वडिलांनी मला भेटून सांगितलं होतं, माझ्या मुलाचा नाद सोड. नाहीतर तुझ्या वडिलांची नोकरी नाही राहणार! माझे वरपर्यंत हात पोहोचलेले आहेत."

“हं! वाटलंच मला! नाहीतर तू अशी हार मानणारी नव्हतीस. तुझं लग्न झाल्याचं कळलं आणि मी खचलोच! जगावसंच वाटे ना. दारूच्या आहारी गेलो. पण मग सुचेता, बाबांच्या मित्राची मुलगी, तिनं सावरलं. मग लग्न झालं तिच्याशीच. बाबांशीही दुरावा कमी झाला मग. आयुष्य जगत गेलो... रादर आयुष्य जगवत गेलं.”

“हो, आयुष्यच जगवत राहीलं. आणि तो ही. त्याच्या टिपिकल अलिप्त, पण जबाबदार व्यक्तीमत्वामुळेच सावरले मी आयुष्यात. पहिलं एक दीड वर्ष स्वत:च्या केविलवाण्या परिस्थितीवर कीव करण्यात, झालेल्या अन्यायाविषयी चरफडण्यात घालवली. मग एक दिवस अचानक लक्षात आलं , ‘चुका कोणाच्या? कोणाला शिक्षा? अन्यायच करतोय की आपणही! आणि अन्याय सहन करणारे आपणही, चूकच नाही का केली?’ डोळ्यांवरचा पडदा झर्कन नाहीसा झाला. मग मात्र अगदी मनापासून संसार केला. त्यानंतर लगेचच त्याच्याशी पहिलं भांडण झालं, भांडण मिटताना म्हणाला , ‘आज खऱ्या अर्थाने माझी बायको आहेस असं वाटलं’. मला भडभडून आलं रे! तेव्हापासून अगदी ठरवून प्रेम करत गेले. दोन सोन्यासारख्या लेकी झाल्या. भरभरून जगलो नंतर मात्र.”

“हं! खरं सांगू? आत्ताही जळलोच, तू त्याच्यावर प्रेम केलस हे ऐकून.पण सुचेतानेही मला कोरडा नाही राहू दिला. रसरसून प्रेम करायला शिकवलं मला तिने. तिचं सगळंच वागणं अगदी जीव ओतून! भांडेलही तितक्याच उत्कटतेने आणि प्रेमही तसंच. मुलगा झाला तेव्हाचा तर तिचा आनंद मी विसरूच शकत नाही कधी.”

“तू तिला सांगितलस माझ्याविषयी?”

“नाही. पण तिला माहीत असावं. कदाचित बाबांनी सांगितलं असावं. तिने कधीच विषय काढला नाहीपण.”

“हं! परिपक्व असावी मनाने.”

“तू, सांगितलस कधी माझ्याविषयी त्याला?”

“नाही. लपवायचं म्हणून नव्हे, पण नंतर गरजच उरली नाही. मी संपूर्ण समरस झाले त्याच्याशी.”

“हं!”

“चहा करतेच आता. हवेत गारवा सुटलाय किती. केव्हाचा कोसळतोय पाऊस!”

“पूर्वी  चिंब भिजायला आवडायचं तुला.”

“हो. अजूनही पाऊस आवडतोच मला. तासंतास खिडकीतून पहात बसते. इथे आल्यापासून तर सारखीच. दुसरं आहे काय करायला?”

“तू, इथे का? कशी?”

“तो गेला दोन वर्षांपुर्वी. लेकी तिकडेच परदेशात, त्यांच्या संसारात रमल्यात. मग मी इकडे परत येण्याचा निर्णय घेतला. संतुष्ट, समाधानाने.एकटं राहाण्यापेक्षा ही संस्था बरी वाटली. समवयस्क लोकं भेटतात. चार गोष्टी बोलता येतात. पण मनासारखं जगता ही येतं. हा दोन रुम्सचा प्लॅटच माझं विश्व झालय.”

“तू?”

“सुचेताला स्ट्रोक झाला वर्षापुर्वी. डावी बाजू अधू झाली. मला म्हणाली, सुनेवर भार टाकून नाही जगायचय मला. आपण वेगळे राहू. मग अगदी वेगळे राहण्यापेक्षा ही संस्था बरी वाटली. म्हटलं तर स्वतंत्र, म्हटलं तर मदत मिळते असं. छान चाललय आमचं. जन्मभर तिने भरपूर केलं, आता मी करतो थोडं फार. तशी ती ही हिंडू फिरू लागलीय काठी , वॉकर घेऊन”

“मग आज नाही आली?”

“आज सकाळीच कोणता तरी जुना सिनेमा लावणार होते ऑडिटोरियम मधे, मैत्रिणीबरोबर मॅडम तिकडे गेल्या आहेत.”

“हं! हौशी दिसतेय!”

“हौशी, सुंदर, कलावान, नेटकी....”.

“पुरे की!”

“हांहां, जळलीस ना, आता हिसाब बराबर!”

“बरं बरं! मग, कधी भेटवतोस सुचेताला?”

“अं, नको!”

“का रे?”

“अगं, आधीची असती तर गोष्ट वेगळी होती. आता जरा हळवी झालीय गं! त्यातून पूर्वीसारखं सगळं एकत्र नाही करता येत आम्हाला. सकाळचं भराभर फिरणं, कधी टेकडी, कधी लांब फिरत जेवायला जाणं, ट्रीप्स ना जाणं. कधी कधी म्हणते ‘माझ्यामुळे अडकून पडलास.’ अशात तुला भेटवलं तर बारीकसा ओरखडा उमटेल मनावर, बोलायची नाहीच काही, मनापासून स्वागत करेल तुझं, पण कुठेतरी कानकोंडी होईल. तिला बारीकशी बोच पण नाही द्यायचीय मला.”

“लकी आहे रे सुचेता, माझ्यासारखीच. हं, घे, गवती चहा घातलाय.”

“आठवत होतं तुला?”

“न आठवायला काय झालं? शिवाय त्याला बिलकुल आवडायचा नाही कसलाही स्वाद चहाला. त्याला प्युअर चहाचा स्वाद हवा असायचा. म्हणून अधिकच आठवायचा गवती चहा!”

“हं! तू आता त्याच्याच आठवणी काढत बसणारेस का?”

“असू दे रे. आता आठवणीच तर आहेत माझ्याजवळ. अरे आपलं अख्खं आयुष्य या दोघांनीच तर व्यापून टाकलं. तू आणि मी फक्त रेशमी वस्त्राला बारीक जरीची किनार असते ना तसे उरलो एकमेकांसाठी. पण वस्त्राची उब, मऊसूत स्पर्श ,हे त्या दोघांनीच दिलं आपल्याला.”

“हं! खरय! चला, निघतो. आज सकाळीच अचानक समोर आलीस आणि ....”.

“(हसते.) हो ना, आजही ठोका चुकलाच माझा एक, पण मूळ हृदय त्याचच झालं रे कधीचं.”

“न दिलेली वचनं किती मनस्वीपणे पाळली त्या दोघांनी.”

“बरं झालं भेटलो ते, आयुष्यभर समजलं नव्हतं ते आज उमगलं , थेट आत शिरलीत ती दोघं आपल्या.

आता त्यांना न दिलेली वचनं आपण मात्र पाळूया.”

“कधीतरी भेटू असेच, त्याच्या आठवणी काढायला, तिचं कौतुक करायला.आणि एकमेकांना चिडवायला.”

# ८ जाणता राजा

“राजन्, क्षमा असावी, अशा ऐरणीच्या प्रश्नावर सारी राज्यसभा थांबली असताना आपणास असं तातडीने आत बोलावून घेतलं.  पण मलाही तितक्याच महत्वाच्या विषयावर बोलायचं होतं. ही सतीची वस्त्रं आणली होती. युद्धावर जाण्यापुर्वी आपणच सर्व राण्यांना ती बहाल करावीत.”

“हा काय प्रकार आहे राणीसरकार? तुमच्या सारख्या सुजाण राणीस हे असे अविचारी वागणे शोभत नाही. आम्हास विजयतिलक करावयाचा सोडून तुम्ही सतीची वस्त्रे मागवलीत? धिक्कार असो. तुम्हीच अशी इथे हार मानलीत हे सर्वोपकर्णी झाले तर सैनिकांचं मनोधैर्य कसं खच्ची पडेल हे आम्ही तुम्हास सांगण्याची गरज का पडावी परम? “

“खरय राजन्, माझं हे वागणं आपल्याला आततायी पणाचं वाटणं साहाजिकच आहे पण जे अटळ आहे त्याची तयारी करणं हेच शहाणपणाचं नाही का? गुप्तहेर संदेश घेऊन आले , चौदा सहस्त्र घोडे, एक सहस्त्र ऐरावत व कित्येक सहस्त्र सैनिक घेऊन शत्रू चालून आलाय. चारी बाजूने आपण वेढले गेलोय. गडावर रसद फक्त एक पंधरवड्याची बाकी असताना आपण खुल्या मैदानात चार हात

करण्याचा निर्णय घेता आहात. मग आम्ही राण्यांनी आमचे कर्तव्य करण्याची तयारी नको करायला?”

“परम, आपण जाणता, पळपुट्याचं जीवन जगण्यापेक्षा शौर्याने मृत्युला सामोरं जाणं आम्हास प्रिय आहे. आणि तरीही स्त्री मोहात आम्हास पाडू पाहता? आपणाकडून आमची ही अपेक्षा नव्हती .

आम्ही आपणास पट्टराणीचा मान दिला ते आपले केवळ सौंदर्य पाहून नव्हे तर आपल्या बुद्धीमत्तेने आम्हास अधिक आकर्षित केले म्हणून. पण आज आम्हास आमच्या त्या निर्णया च्या योग्यअयोग्यतेबद्दल शंका वाटावी असे हे वर्तन आहे आपले.”

“राजन्, आपल्या मनात तशी शंका आली हे योग्यच झाले. आता आम्हास मोकळेपणाने बोलता येईल. आपण अत्यंत कुशल योद्धा, शौर्यात आपला हात धरणारा अजून तरी जन्माला आलेला नाही. जनहित सतत आपल्या मनात अग्रेसर असते असे आपला शत्रूही मानतो. मग आज आपण एवढे स्वार्थी कसे झालात राजन्?”

(ताडकन उठत) “परम!. राणीसरकार ... आपण एका राजाशी बोलत आहात हे विसरू नका.

आपली ही मजाल?”

“क्षमा असावी महाराज, पण एवढा बलाढ्य शत्रू, सर्व शक्तीनिशी चौफेर वेढा देवून बसला असता, केवळ आपल्या शौर्याचे गोडवे गाईले जावेत म्हणून असा आत्मघातकी निर्णय घेऊन तुम्ही काही शेकडा सैनिकांना घेऊन खुले युद्ध करू म्हणता, याच्या परिणामाचा विचारही आपल्या मनास शिवत नाही यांस स्वार्थ नाही तर काय म्हणावे राजन्? आपण केवळ योद्धा नव्हे तर राजे आहात याचा आपणांस विसर पडला म्हणावे का? राजास सर्वप्रथम जनतेचे हित महत्वाचे, त्यासाठी त्याचे शौर्य कामी यावे, त्याचे कौशल्य त्याने वापरावे.

आज युद्धभुमीवर कित्येक शत्रुपक्षातील सैनिकांना आपण वीरगती द्याल यात कुणाच्याच मनात शंका नाही पण त्याचबरोबर आपल्यापैकी कोणीही परत येणार नाही हे सांगण्यास कोणत्याही ज्योतिषाची गरज ही नाही. आपल्या मागे आम्हीच नव्हे तर सगळी प्रजा पोरकी होईल. नुसतीच पोरकी नव्हे तर जालीम शत्रू तिचे लचके तोडेल . पुन्हा कधीही या राज्याचा तुटलेला कणा सांधला जाणार नाही.

शत्रूच्या या हल्ल्याला मुत्सद्दी पणानेच उत्तर देणे योग्य हे आपणही जाणता. पण आपला अहं आपणास तसे करू देत नाही.

आपल्यासारख्या राजासमोर स्पष्ट बोलण्याची हिम्मत आज राजसभेत कोणाकडेच नाही.

आपल्या बाबतीत युद्धभुमीवर अनेक चमत्कार होतात असे राजसभेचे मानकरी व प्रजा मानते. बऱ्याचदा अत्यंत कठीण परिस्थितीतून आश्चर्यकारकरित्या आपण विजय मिळवलाही आहात. पण कठीण परिस्थिती व अशक्य परिस्थीतीतला फरक आपण ही जाणता व मी ही जाणते.

अंतीम निर्णय आपलाच असेल राजन्. आपण जो निर्णय घ्याल त्यात मी आपल्याबरोबर असेन हे वेगळे सांगायला नकोच.

परत एकदा क्षमा मागते आपली, असे मधेच आपणांस राजसभा सोडून यावे लागले."

"बराच वेळ झाला. राजसभा खोळंबलीय. येतो आम्ही."

परम चे डोळे अश्रुंनी भरलेले. "राजन्... म्हणजे आपण ... निर्णय नाहीच बदलणार का? मग आम्हास आपणास एकवार पाहून तरी घेऊ देत. आपल्या मागे आम्ही येऊच पण तरीही!"

"परम, आपण आम्हास विजय तिलक करावा. युद्ध तर करूच. पण तुम्हास वाटते तसे फुकाचा शौर्याचा अभिमान

बाळगणारे आम्ही नव्हे. एक वेगळीच खेळी आहे. निश्चिंत असावे. याहून अधिक सांगण्यास वेळ नाही.''

''पण डोळे पुसा बरं, नाहीतर थांबा, आम्हीच पुसतो आमच्या अंगरख्याने, हेच सुंदर छाप आम्हास सतत तुमची आठवण करून देतील युद्धभुमीवर व आश्वस्तही करतील की काही बरेवाईट घडलेच तर या राज्याची धुरा सांभाळण्यास आमची परम सक्षम आहे!''

# ९ @५०+

“तू हल्ली भयंकर बेजबाबदार झालायस स्वत:च्या सेफ्टी बाबत” तिचा स्वर चांगलाच चढलेला.

“मुर्खासारखं बोलू नकोस काहीतरी” अचानक झालेल्या या तिच्या वाक्हल्ल्याने बिलकूल डळमळून न जाता त्याचा नेहमीप्रमाणे प्रतिहल्ला!

“हो, ऐन संध्याकाळी मिट्ट काळोखात काळा शर्ट घालून या हायवेवर दोन्ही बाजूने वाहणाऱ्या वाहनांच्या नदीतून चालत निघालेला तू, दीडशहाणाच म्हणायचा, आणि मूर्ख आम्हीच” आज ती ही इरेला पेटलेली.

“बावळटासारखं बोलू नकोस काहीतरी” असं म्हणत असतानाच एक बाईक वाला आदळता आदळता राहिलेला.

“घ्या” तिचा विजयी हुंकार!

“तुझ्या आचरट बडबडीमुळे दुर्लक्ष झालं माझं” त्याची पार चिडचिड झालेली.

“भले शाब्बास” तिचं आगीत तेल.

हायवेवरच्या सोसायटीतलं फ्लॅटसंदर्भातलं काम संपवून कार घरी पाठवून दोघं चालत निघालेली.

“रात्री चल म्हटलं असतं फिरायला तर आली नसतीस. हजार कारणं सुचतात मग तुला” त्याचा करवाद!

“इतर बायकांना नवरे व्यायाम करत नाहीत म्हणून त्रास असतो, आणि आमचे वीर निघालेत पन्नाशी ओलांडली तरी पंचविशितली हाराकिरी करायला” तिची टकळी चालूच.

“कितीही पोट सपाट बिपाट दिसलं ना तरी पांढऱ्या केसांना मुली ‘काका’ ‘आजोबाच’ म्हणतात बरं! “

हे म्हणजे जखमेवर मीठ.... छे छे डायरेक्ट मिरचीच!

त्याचा पारा पार सातव्या आसमानावर. “एक शब्द बोलू नकोस पुढे. सतत कटकट कटकट. च्या** , उगाच चल म्हटलं तुला, एकटाच यायला हवं होतं, गप्प बस आता, वटवट नकोय मला. “

ती ही भडकलेली. मग अबोल्यानेच घरापर्यंतचा रस्ता पार.

“ज्याचं करावं भलं...... माझं काय नडलय.... करा हवं ते..... दीडशहाणे टिकोजीरावच हे.....”

तिची मनातल्या मनात चिडचिड आणि जोडीला पुटपुट!

रात्रीची जेवणं घुश्शयातच पार! आजाआजी आणि मुलांची एकमेकात गुपचुप नेत्रपल्लवी! बिनसलय काहीतरी!

रात्री तिला प्रचंड झोप आलेली आणि त्याला टी व्ही वर तद्दन फालतु दक्षिणेतला डब केलेला सिनेमा पाहायचा मूड. दोन वेळा

झोपमोड झाल्यावर ती उठून दुसऱ्या खोलीत उशी , रग घेवून, जाताना धाडकन बेडरूमचं दार आपटून.

पहाटे सवयीने त्याचा हात शोधतो तिला.... ती दुसऱ्या खोलीत. झोप उडतेच त्याची. मग सकाळी टेकडीवर जायला नेहमीप्रमाणे त्याच्या उठण्याची वाट पहावी लागत नाही. तिच्या आधीच तयार.... अगदी नीकॅप सकट.... अबोला कायम.

टेकडीचा फेरफटका चूपचाप पूरा. तिला आज काहीच नाही पहायचय. ना सुर्योदय, ना पक्षी, ना कमळं... रपारप चालतेय नुसती.

मग हळूच मागून येऊन हात धरतो तो...... ती आश्चर्यचकित.... पब्लिक रोमान्सच्या पूर्णपणे विरोधात असणारा तो... चक्क हातात हात घेऊन..... ???

पन्नासात २ मिळवल्यावरही ऐन पंचविशीसारखा एक ठोका चुकतोच तिचा,

नजरेच्या कोपऱ्यातून बघते.... हसत असतो गालातल्या गालात... जाम हँडसम दिसतो तो असा तिला, ती ही हसते मग, गालातल्या गालात.

तळव्यांनी एकमेकांना “सॉरी” म्हटलेलच असतं. हातात हात धरून टेकडी उतरते जोडी. मग मात्र प्रॉम्प्टली हात सोडून घरी.

आज ती तिला आवडत नसूनही व्हॅनिला कॉफिमेट घालून कॉफी करते त्याच्या आवडीची, दोघांसाठी!

# १० तू_आणि_मी

“हं! आता मी ऑफिसला जाते आणि तू स्वैपाक कर.

काव्या श्रेयसला म्हणाली.

“ए, चल, चल! हॅट! असं नसतं काही. बॉईजनी ऑफिसला जायचं, गर्लसनी कुकींग करायचं.”

“ए असं नाही बाबा! मलापण जायचय ना ऑफिसला! मी रोज रोज स्वैपाक का म्हणून करायचा?”

“आम्ही बास मग! आम्ही नाही खेळणार जा!”

“ए, आजी, बघ ना गं, हा श्रेयस कसा करतोय!” काव्या गाऱ्हाणं घेऊन आजीकडे गेली.

श्रेयसने दाणे गूळ घेऊन धूम ठोकली आपल्या घराकडे.

---

“हॅलो, काव्या, कालचा होमवर्क केलायस का?”

“हो, अर्थात! तुझा नाही ना झालेला?”

“पाठव ना यार वॉ ॲ वर. मी फटाफट कॉपी करतो. ती नायर मिस फुकट नोट पाठवेल. मग मॉमची परत कटकट!”

“फुकट? तू होमवर्क केला नाहीस तर पाठवणारच!”

“ए तू आता लेक्चर नको हं देऊस. पाठव पटकन. कोण ते बोअर काम करत बसणार?”

“हे शेवटचं हां ! परत नाही पाठवणार, तू करायला विसरलास तर!”

“हो गं! कळलं!”

---

“हाय!”

“हाय!”

“उद्या येतेस ना?”

“कुठे?”

“बास का? भाव खातेस काय?मी साडेसातला पिक करतो तुला. काय?”

“मलाच का?”

“म्हणजे काय?”

“नुपूरला ने! मुकुल ला ने!”

“ओह! असंय होय?हाहाहा!”

“असंय काय?”

“काही नाही काही नाही.”

“बोल बोल!”

“काही नाही गं!”

“मी येतोय साडेसातला!”

“सांगितलं ना मला नाही जमणार!”

“अरे, काय भाव खाते उगाच!”

“उगाच?”

“बरं बाई! प्लीज ये ना माझ्याबरोबर त्या पार्टीत. नुपूर आणि मुकुल इतर वेळी ठीक आहेत गं! पण तशा क्लासी नाहीत.”

“माझ्यासारख्या?”

“हो बये, तुझ्यासारख्या!”

“हं!”

“येतोय मी उद्या!”

---

“मी मा,पा ला घेऊन घरी येतोय तुझ्या!”

“कशाला?”

“तुला मागणी घालायला!”

“काहीतरीच काय?”

“त्यात काय आहे काहीतरीच?”

“मला नाही करायचय लग्न तुझ्याशी.”

“काहीतरीच काय?”

“त्यात काय आहे काहीतरीच?”

“अगं, लहानपणापासून आपण नवरा बायको होऊन खेळत आलो.”

“मग?”

“मग काय? आता हे ठरलेलंच आहे ना तसं?”

“कोणी ठरवलं?”

“मी.. म्हणजे, तुलाही मी आवडतो ना?”

“श्रेयस, काय आहे आवडण्यासारखं तुझ्यात?”

“काव्या!!”

“नाही, सांग ना! काय आहे? तू स्वत:मधेच इतका रमलेला असतोस की दुसऱ्या कोणाला जागाच नाही तुझ्या विश्वात. आणि मला नकोय असा जीवनसाथी.”

“पण मग माझ्याशी मैत्री कशी ठेवलीस? ती नाही तोडलीस?”

“मैत्रीचं समिकरण निराळं असतं अरे. मैत्र असतंच तुमच्या सगळ्या दोषांसकट स्विकारण्यासाठी. त्यात कसलंही बंधन नसतं.

करार नसतो. तू ही ठेवलीसच ना माझ्याशी मैत्री! आपले विचार संपूर्णपणे विरूद्ध असूनही. पण आता तू मला गृहित धरलंस तेही एका कायमच्य नात्यात, हे कसं चालेल?”

श्रेयस चांगलाच विचारात पडला!!

# ११ वर

रामच्या वडलांचा अचानक ह्रदयविकाराने मृत्यू झाला आणि रामचं कुटूंब दु:खाच्या खाईत लोटलं गेलं. राम तर पार मुळापासून हादरला. काहीच वेळापूर्वी आपल्या बरोबर बसून हसत खेळत नाश्ता करणारे आपले बाबा, अचानक या जगातून नाहीसे झाले. याला काय अर्थ आहे? असं कसं चालेल?

काहीतरी तोडगा काढायलाच हवा.

मग रामने सगळे जुने ग्रंथ धुंडाळायला सुरवात केली. कसून तपास सुरू केला. वाचनाचा सपाटा लावला.

आणि शेवटी त्याला एक संदर्भ सापडला. खात्रीलायक उपाय. अतिशय अवघड, पण खात्रीचा.

रामने सर्व पूर्वतयारी केली. व त्याने साधनेला सुरवात केली. घरच्यांना रामचा जिद्दी स्वभाव चांगलाच परिचयाचा होता. त्यामुळे कोणी काही बोलण्याचा प्रश्नच नव्हता. पाहता पाहता रामची तपश्चर्या कडक होत चालली.

नारायणाने नारदाकरवी यमराजांना निरोप धाडला. यमराजाचा रेडा सुस्तावला होता. “काय कटकट आहे? ही काय वेळ झाली मीटींग बोलवायची? तुमच्या ऑर्गनायझेशनमधे तुमची काही पत आहे की नाही?” तो डाफरलाच यमराजांवर!!

“अरे, सबुरीने घे!” ते नरमाईच्या स्वरात म्हणाले. “तुला माहित आहे ना सध्याची स्थिती? कोरोना उद्रेकानंतर भारतातून करोडोंमधे आत्म्यांना उचलता येईल अशी अटकळ होती. ब्रह्मदेवाने सगळी तयारी करून ठेवली होती. आला आत्मा ताबडतोप नव्या मुशीतून काढून, नवा माल पृथ्वीवर पाठवण्यासाठीची सर्व यंत्रणा तयार ठेवली त्यांनी. पण कसलं काय नि कसलं काय? मला जेमतेम लाख दीडलाख कच्चा माल पुरवता आला त्यांना. साहाजिकच पत खाली झाली माझी. आता नोकरी टिकवून ठेवायची तर निदान बोलवल्याबरोबर हजर तर राहायलाच लागणार ना?”

“हं! चला! कुठून यमाचा रेडा झालो असं झालंय मला!”

शेषशायी अस्वस्थपणे या कुशीवरून त्या कुशीवर वळत होते.

“अहो! जरा शांत झोपाल का? असे सारखे हलत राहिलात तर मला नाही बाई पाय चुरायला जमायचे. आणि मेलं हवेत कशाला पाय चुरून? काय मोठे डोंगर पालथे घालताय रोजचे?

इथंच तर लवंडलेले असता सततचे!! माझी मेली कंबर भरून येते पालथी मांडी घालून पोजमधे ताठ बसायचं म्हणजे!” लक्ष्मी तणतणली!!

शेषशायींची नजर क्षणभरच क्रुद्ध होत निवळली. मग नेहमीचं कमावलेलं हसू चेहऱ्यावर आणत ते म्हणाले, “शांती लक्ष्मीदेवी! शांती! त्या यमाची प्रॉडक्टीविटी कमालिची खालावलीय! तो ब्रह्मदेव सतत माझ्या नाभीला ढुशा देतोय. स्वर्गलोकाची कशी नाचक्की होतेय वगैरे कटकट करतोय. त्यातून त्या भूतलावरील महाभागाने कसली तरी तपश्चर्या चालवलीय. सगळीकडून नुसता त्रास आहे! तुम्हाला काय जातय म्हणायला, न्युसते लॅवंडल्येल्ये तर ॲसता..... ! हं!”

यमराज हात जोडूनच आत आले. तोंडावर अगदी कसनुसं हसू! त्यांना पाहून लक्ष्मीदेवींनी नाक मुरडलंच! यमराजांना खरंतर प्रचंड राग आलेला. पण सांगतात कोणाला. निमूट उभे राहिले.

“काय यमराज? काय हालहवाल? “

“ठीक आहे देवाधिदेव! “

“ठीक आहे? अहो ब्रह्मदेवांना तुम्ही कच्चा मालच पुरवला नाही तर ते विश्वनिर्मिती करणार कशी? यमराजांच्या नाकर्तेपणामुळे टर्नओव्हर पुरता बोंबललाय असा ओरडा करताहेत ते. “

“हं! हं! हो जरा गणित चुकलय खरं! भारतातून भरपूर आत्मे माल उचलता येतील  म्हणून होता नव्हता तो सगळा स्टाफ मी जय्यत तयार ठेवला. पण तिथल्या लोकांनी गनिमी काव्याने आमचे सगळे प्लॅन धुळीला मिळवले.”

“हं! आणि तो कोण मानव तपश्चर्येला बसलाय? भंग करण्यासाठी काही प्रयत्न वगैरे कराल की नाही? “

“हं! हो! हो! कालच बातमी कळली मला! “

“यमराज! पूर्वीचा जोश राहिला नाही तुमच्या कामात. करा काहीतरी! इतर बरेच इंटरेस्टेड आहेत या पोस्टसाठी.”

“मी निष्ठावान अधिकारी देवाधिदेवांचा. एक संधी द्या.”

“ठीक आहे. गरज पडली तर नारदाची मदत घ्या.”

“हो, हो, येतो मी!”

“नारायण नारायण!”

रामने डोळे उघडले. नारद मुनी प्रसन्न चेहऱ्याने समोर उभे. रामने उठून नमस्कार केला.

नारदांनी “आयुष्यमानभव!” असा आशीर्वाद दिला. “बोल वत्सा! का तपस्या करतो आहेस? काय आहे मनात?”

“मला यमराजांना प्रसन्न करून घ्यायचे आहे. त्यांच्याकडून मला वर हवा आहे.”

“कसला वर हवा आहे?”

“तो मी त्यांनाच सांगेन.”

“हरकत नाही. पण तुला यमराज किती चतुर आहेत माहित आहेत ना? त्यामुळे जो काही वर मागशील तो नीट विचार करून माग. नाहीतर एवढी केलेली तपस्या वाया जायची. यमराज तुला वर देताना काहीतरी पळवाट नक्की काढणार”

राम विचारात पडला.

नारद म्हणाले “तुझी तपस्या देवाधिदेव श्रीविष्णू ना समजली, म्हणून त्यांनी मला तुझ्या मदतीला पाठवले. पण मला तुझ्या इच्छेविरूद्ध मदत नाही करता येणार. चला, चालू दे तुझी तपस्या. यमराज निघालेच असतील इकडे यायला. वर मागताना फसगत होऊ देऊ नकोस.

नारायण नारायण!”

“थांबा मुनीवर! मला तुमच्या मदतीची गरज आहे.”

नारदाच्या चेहऱ्यावरची प्रसन्नता कैक पटींनी वाढली.

“मुनीवर, माझे वडील अचानक मृत्यू पावले. तेव्हा मी विचलित झालो. घरदार हादरून गेले. मला माझे मरण कधी, व कसे येणार हे आधीच कळावे  अशी माझी इच्छा आहे. मी हाच वर मागणार आहे.”

नारद मुनी गालातल्या गालात हसले.

“हं! तपस्या फार मोठी आहे वत्सा तुझी. नुसता कधी व कसा मत्यू येणार हे जाणून घेण्यापेक्षा तू तो तुझा तुला ठरवता यावा असा वर का नाही मागत?”

“असं येईल मागता?”

“न यायला काय झालं? एवढी तपस्या करतो आहेस. शिवाय मागताना भरपूर मागावं. मग थोडसं मिळतं. तेव्हा आता हा विचार कर की मृत्यू कसा हवाय तुला? केव्हा हवाय? अचानक, तुझ्या वडलांसारखा? की अपघाती मृत्यू? की हळूहळू, आधी व्याधींनी पूर्वसूचना देऊन? भरपूर शारिरीक हालअपेष्टा होऊन? जवळच्या लोकांनी तुझ्या जाण्याची इच्छा करून? वाट पाहून?”

राम विचारात पडला. त्याच्या नजरेसमोर त्याचे जर्जर झालेले शरीर दिसू लागले. जवळची मंडळी कंटाळून डोक्याला हात लावून बसलेली दिसू लागली. त्याने जोरजोरात नकारार्थी मान हलवली.

"किंवा तू असं का नाही करत? भरपूर आयुष्य मागून घे! किंवा त्यापेक्षा अमरत्वच का नाही मागत?"

राम एकदमच हुशारला. "असा वर मिळेल?"

"अरे, तू विचारपूर्वक निगोशिएट केलं पाहिजेस. पण काय हवय ते मनाशी नक्की ठरव. द्विधा मन नको. बघ हं! समजा, तू हजार वर्षांचं चीरतरूण आयुष्य मागितलंस, आणि मग अचानक मृत्यू, तर कसं होईल? म्हणजे बघ तुझ्या पुढच्या दहा पिढ्यांचा तू साक्षीदार असशील. तुझी नातवंडं, पतवंडं सगळे तुझ्या डोळ्यांसमोर जन्म तर घेतीलंच, पण त्यांचं संपूर्ण आयुष्य तुला पाहता येईल. अर्थात त्यांचे मृत्यूही पाहावे लागतील मात्र. तुला मिळालेलं हजार वर्षांचं चीरतरूण आयुष्य त्यांना खटकेल का रे कदाचित?"

नारदाने हळूच पिल्लू सोडलं.

रामचा मगाशी हुशारलेला चेहरा एकदम काळवंडला. "माझ्या प्रिय बायकामुलांचेही मृत्यू मला पाहावे लागतील." तो हताश होत म्हणाला.

“हो, ते तर पाहावे लागणारच!”

“मी फक्त माझा मृत्यू कधी होणार आणि कसा होणार एवढंच जाणून घेण्यासाठी तपस्या करत होतो, मी तेवढंच मागेन.”राम चिडून म्हणाला.

“नारायण! नारायण! हं! असं म्हणतोस! बरं तसं तर तसं! पण यमराजाने तुला एकदा का हे सांगितलं की मग काय होणार?”

“काय होणार?”

“ विशेष काही नाही. फक्त सांगितल्या क्षणापासून तू त्या क्षणाचाच विचार करकरून कष्टी होणार! तो दिवस फार दूर असेल, तर कदाचित काही वर्ष तू सुखाने घालवशील. पण मग तू सतत त्या दिवसाचाच विचार व भयाने तुझे राहिलेले दिवस, महिने, वर्ष व्यतीत करशील.”

राम कमालीचा हादरला. “मुनीवर, तुम्ही म्हणालात की यमराज यायला निघालेत. मी आता काय करू? मला कसलाच वर नकोय! चुकलंच माझं, मी अशी तपस्या केली ते.”

“नारायण! नारायण!”

“लवकर सांगा मुनीवर!”

“तू नीघ इथून लगेच! मी पाहतो यमराजांना काय सांगायचं ते!”

रामने नारदांना नमस्कार केला व तो पळत सुटला घराकडे. झाडामागे लपून बसलेला यमराज बाहेर आला.

“तुझे खूप उपकार झाले  नारदा!”

“नारायण नारायण!”नारद अदृश्य झाले.

रेड्याने तोंडातली गवताची काडी तुच्छतेने थुंकली.

“हं! चला आता!”

“चल बाबा,”दमलेला यमराज म्हणाला.

# १२ नातीगोती

त्याची मोटरसायकल वायूवेगाने निघाली होती. कसंही करून त्याला पोहोचायचंच होतं. वडलांना भेटायचंच होतं. सुसाट वेगाने तो निघाला होता. अचानक चाक वळलं आणि तो कोसळला. काही क्षण नुसता अंधार!

मग काही वेळाने जाग आली, वडलांना शेवटचं, ते निघण्यापूर्वी भेटायचय, हा एकच विचार मनात!

तो एकदाचा धापा टाकत फलाटावर पोहोचला. धावून धावून छाती भरून आलेली. ही.. गर्दी उसळलेली. कसं शोधू बाबांना? रडवेला झाला.

बाबा माझ्याजवळ होते तोपर्यंत त्यांच्या मनासारखी एक गोष्ट केली नाही मी. आणि आता निघालेत, तेव्हा जीव तळमळतोय माझा.

शिक्षण घे म्हणाले, मी नोकरीधंद्यात पडलो.

त्यांच्या मित्राची मुलगी करून घे म्हणाले, मी लवमॅरेज केलं.

त्यांना सगळं घर एकत्र बांधून ठेवायचं होतं, मी वेगळा राहिलो.

सगळी भावंडं त्यांच्या आज्ञेत, मी बंड केलं.

“बाबा..... “ त्याने आर्त साद घातली ह्रदयापासून, एकदा, दोनदा.

अचानक चार जण थांबले. वळले. हात पुढे करून त्याच्याकडे येऊ लागले. त्याला कवेत घेण्यास सरसावले! डोळयांत पाणी आणून “माझ्या बाळा...” असं म्हणत ते पुढे पुढे येऊ लागले.

तो मागे सरकला एकदम!

स्टेशनमास्तर आला. हा म्हणाला “मी माझ्या बाबांना शोधतोय.”

“हाकारलस का?”

“हो!”

“मग? “

“हे वेगळेच लोक आहेत.”

“परत नीट हाक दे बरं.”

त्याने परत पुकारलं, अधिक अधिरतेने, उत्कटतेने!

आसपास पाहत होता, तर फलाटाच्या दोन्ही बाजूंनी कित्येक जण हात पसरून आले, “माझ्या लेकरा” म्हणत! काही प्रेमाने, काही त्वेशाने, काही अगतिकतेने.

काही साधेसुधे, काही श्रीमंती कपड्यात, काही खानदानी, काही अगदी भिकारडे! त्याचे वडिलही होते त्यात. पण हे कोण बाकीचे?

तो भांबावला. स्टेशनमास्तरकडे पाहू लागला.

“हे सगळेच बाप तुझे! वेगवेगळ्या काळातले.”

“पण मला फक्त हे एकच आठवताहेत. मला हेच फक्त हवेत.”

“तसं नाही होणार! मिळायचे तर सगळे मिळणार! नको असतील तर सर्वांना मोकळं कर! म्हण संपला तुमचा माझा संबंध!”

तोपर्यंत ती सगळी माणसं अगदी जवळ आलेली, हाताने ओढू ओरबाडू लागलेली.

“संपूनच जाईन मी!”धास्तावून म्हणाला.

स्टेशनमास्तर हसला.

“तसा संपलास तेव्हाच तर इथे पोहोचलास. आता तुला संपवायचय सगळं, तरंच संपेल.”

अगदी निकराच्या क्षणी तो म्हणाला, “संपला तुमचा माझा संबंध!! व्हा मोकळे आणि मलाही करा!”

सगळे क्षणात शांतावले! आपापल्या मार्गाने एक एक करत निघून गेले.

हा ही मग शांतपणे निघाला!!

तळटीप : मेरी टॅबोर यांच्या " To thine own self" या पुस्तकातील एका भागावर आधारित.

# १३ तो_आत्ता _इथे_नाही

“हॅलो, सुरेश, अरे जीवनला भेटलास का एवढ्यात?”

“नाही रे. बरेच दिवस झाले, दिवस काय वर्षच खरं तर. फोन वर बोलणं झालं होतं मध्यंतरी. बस तेवढच. का रे?”

“मला वाटतं तू एकदा भेटून यावंसं त्याला.”

“का रे?”

“अरे त्याचा एक अगदी जवळचा मित्र गेला मध्यंतरी. तेव्हापासून फार बदललाय तो. फार मनाला लावून घेतलय त्याने. तू ही त्याचा जवळचा मित्र आहेस. तुला भेटून सावरेल कदाचित.”

“हं ! फोनवर म्हणाला मला की अगदी जवळचा मित्र गेला. जाईन वेळ काढून. बरं झालं सांगितलंस ते.”

मग मी जरा सवड काढून गेलोच भेटायला जीवनला.

जोशा म्हणाला तसा जीवन खरंच खूप खंगलेला दिसला मला. डोळे पार आत ओढलेले. पार रया गेली होती बिचाऱ्याची. मला पाहून बरं वाटलेलं दिसल चेहऱ्यावर. चहा पाणी झालं.

ख्याली खुशाली विचारून झाली. मग मी जरा फ्रेश व्हायला गेस्टरूम मध्ये गेलो. फ्रेश होऊन परत हॉल मध्ये येत असताना एक जण जीवनच्या  खोलीतून बाहेर पडला. मी ओळखत नव्हतो त्याला पण चेहरा पाहिलेला वाटत होता.

मला पाहून मान हलवत म्हणाला, "तो आत्ता  इथे नाही " असं म्हणून मी काही बोलायच्या आतच  निघून गेला. मला फार आश्चर्य वाटलं. काही मिनिटांपूर्वीच मी जीवनला त्याच्या खोलीत भेटून बाहेर आलो होतो. ‘एवढ्यात कुठे गेला असेल? काही म्हणालाही नाही.’ त्या माणसाचं काही महत्वाचं काम असावं. फार फार नाराजीने मान हलवत गेला होता तो. जीवनला याविषयी सांगायाला हवं,  असं मनाशीच म्हणत मग मी जरा गावात फेरफटका मारायला बाहेर पडलो.

रात्री डायनींग टेबलवर जीवन भेटला तेव्हा मी त्याला म्हटलं, “तू कुठे गेलास अचानक? एक माणूस तुला भेटायला येऊन गेला.”

जीवन आश्चर्याने म्हणाला, “छे, मी कुठेच नाही गेलो. इथेच तर होतो.”

“अरे, तो तुझ्या खोलीतूनच बाहेर येऊन म्हणाला की तू नाहीयेस. मग मी गावात एकटाच फेरफटका मारून आलो.”

जीवनला चांगलच आश्चर्य वाटलेलं दिसलं. पण तो पुढे काही बोलला नाही.

मग परत इकडच्या तिकडच्या गप्पा करत असतानाच मधेच तो गप्प झाला आणि आपल्याच विचारात गुंतला. पुढचं जेवण मौनातच पार पडलं मग. मी ही दमलो होतो प्रवासाने. लवकर झोपावे म्हणून जीवनची रजा घेऊन मी निघालो. तो ही बरं म्हणाला.

दुसऱ्या दिवशी सकाळीच तो माणूस परत हॉलमधून बाहेर पडताना दिसला. माझी चाहूल लागताच वर जिन्याकडे तोंड करून म्हणाला, "तो आत्ताही इथे नाही ". आणि मग बाहेर पडला. मी त्याला हाक मारून नाव तरी विचारावं म्हणून घाईघाईने जिना उतरून आलो, पण तो तेवढ्यात निघून गेला होता.

मी माझा नाश्ता चहा वगैरे आटोपून स्टडीकडे गेलो, काही वाचावं म्हणून, तर जीवन तिथल्या खुर्चीत बसला होता. पाय

समोर टेबलवर होते. नजर शून्यात होती. सर्वस्व गमावल्याचे भाव चेहेऱ्यावर  होते. मला पोटात गलबलून आलं. ‘इतका जिंदादिल मित्र हा माझा, नेहमी सगळ्यांना हसवणारा, वातावरण आनंदी ठेवणारा, हवाहवासा वाटणारा, काय दशा करून घेतलीय याने.’

“जीवन, सावर स्वतःला. काय दशा करून घेतलीस स्वतःची! जाणारा गेला. दु:ख होणं स्वाभाविक आहे. पण असं आयुष्य वाया घालवून कसं चालेल?”

“फार जवळचा मित्र होता रे माझा. कधीही यायचा आणि आम्ही तासंतास गप्पा मारायचो. कधी काही कामं एकत्र करायचो. कधी ट्रेक ला जायचो. कधी फिरायला. मला त्याच्याशिवाय आयुष्यात काही रामचं नाही असं वाटू लागलय.”

मग तो परत आपल्याच कोशात गुरफटला. मला काळजीच वाटू लागली त्याची. ‘कसा बाहेर काढावा त्याला?’

“जीवन अरे तो माणूस परत येऊन गेला रे. आणि तू नाहीस म्हणत गेला.”

“कधी?”

“हे काय आत्ताच काही वेळापूर्वी. आणि तुझं घर त्याच्या चांगलच परिचयाचं असावं. कारण सराईतासारखा वावरत होता तो.”

जीवन चांगलाच आश्चर्यचकित झाल्यासारखा दिसला यावर. “मी तर इथेच आहे. मग मी नाहीय  असं का सांगतोय तो ?”

एकदोन दिवस असेच गेले. माझी परतण्याची वेळ झाली होती. रात्री शेवटचं जीवनला समजवावं असं मी ठरवलं होतं. ‘इतर कोणीही कितीही समजावलं तरी स्वतः  जोपर्यंत जीवन यातून बाहेर पडण्याचा  प्रयत्न करणार नाही तोपर्यंत कोणीच काही करू शकणार नाही,’ मी मनाशी विचार करत होतो.

मी तयार होऊन खाली हॉलमध्ये आलो. आज आम्ही दोघे बाहेरच जेवायला जाणार होतो. जिन्याचा तोंडाशीच तो माणूस परत मला भेटला. मान हलवत म्हणाला, “आत्ताही तो इथे नाहीच. तो आत्ता इथे राहिला तर किती बरे होईल.” इथे आत्ता या शब्दांवर जोर देत तो म्हणाला.

“अहो, थांबा. तो कपडे बदलत असेल. मी सांगतो तुम्ही आल्याचं.”

"काही उपयोग नाही. तो इथे नाहीच आहे. मी आत्ताच वर त्याच्या खोलीत जाऊन आलो."

मी इतका आश्चर्यचकित झालो की काही बोलायला सुचलंच नाही. तो तेवढ्यात निघूनही गेला.

मी बाहेर जाऊन तो असेल तर त्याच्याशी बोलावे या उद्देशाने गेलो पण मला तो लांब गेटच्या बाहेर पडताना दिसला. चांगलीच चुटपुट लागली.

काही वेळाने जीवन आला तेव्हा मी म्हटलं, "अरे तो माणूस पार तुझ्या खोलीपर्यंत जाऊन आला. कुठे होतास तू ?"

"काहीही काय?आपलं जायचं  ठरल्यावर मी  खोलीत कपडे बदलून बसलोच होतो इतका वेळ. हा माणूस कोणी चोर वगैरे तर नाही?"

“नाही रे. तो तुला आणि घराला चांगलाच ओळखतो. अगदी सराईतासारखा वावरतो तुझ्या घरात. जवळच राहाणारा तुझा कोणी मित्र असावा.”

अचानक जीवन चा  चेहरा बदलला. “नाही रे, आता तसा कोणी नाही. जो होता तो तर गेला.”

मग तो गप्पच झाला.  ठरवल्यासारखे आम्ही बाहेर गेलो जेवायला पण जीवन आपल्याच नादात होता. त्याचा मित्र गेल्यापासून तो असा झाला असावा. बराच वेळ तो त्याच्या आठवणींमध्येच रममाण व्हायचा आणि आता तो नाही ही जाणीव झाली की दु:खी  व्हायचा. आयुष्य जगायला विसरला  होता तो.

दुसऱ्या दिवशी पहाटेच मी जीवनचा निरोप घ्यावा आणि त्याला काहीतरी समजवावं शेवटचं  म्हणून त्याच्या खोलीत गेलो तर जीवन गुडघ्यात मान  खुपसून हमसून हमसून रडत होता, आणि तो माणूस त्याच्या डोक्यावरून,पाठीवरून हात फिरवत होता. मला एकदम पुढे जावंसं वाटेना. फार जवळची व्यक्ती असावी. मग मी बाहेर आलो. काही वेळाने तो माणूसही बाहेर आला.

माझ्याकडे पाहून म्हणाला, “हा किती दिवस असाच पुढे मागे झुलत राहिलाय? त्याने वर्तमानात जगायला हवं. किती जिंदादिल

होता जीवन. आनंदी, हसरा, हवाहवासा. त्याने तसच राहायला हवं. सांगा त्याला मी कितीदा त्याला भेटायला येतो, पण तो नसतोच इथे मला भेटायला. त्याने आनंदाने जगायलाच हवं.'' मग तो एक आनंदी हसू हसला आणि अंधारात बाहेर निघून गेला.

मी जीवनच्या खोलीत गेलो, तो आता रडत नव्हता. पण हातातल्या फोटोकडे पाहून काहीतरी पुटपुटत होता. ''माझ्या प्रिया मित्रा किती बहार होती जेव्हा तू होतास. आता तुझ्याशिवाय हे जिणं मृतप्राय आहे.''

नकळत माझी नजर फोटोकडे वळली. मी दचकलोच क्षणभर. फोटो त्या माणसाचाच होता. जो आत्ताच एक दैवी आनंदी हसू मला देऊन निघून गेला होता.

हा कसला दैवदुर्विलास होता? जीवन ज्याच्या आठवणीने मरणप्राय आयुष्य जगत होता तो मात्र केव्हाच आनंदाने पुढे जाऊनही केवळ जीवनला परत एकदा जगण्याची आकांक्षा देण्यासाठी परत परत येत होता.

जीवनला मी हे समजावण्याचा प्रयत्न केला, पण तो माझ्यावर प्रचंड संतापला, जेव्हा मी म्हटलं की ''तुझा मित्र आनंदात आहे,

तो पुढे निघालाय, पुढच्या प्रवासाला, पण तू मात्र अडकला आहेस भूतकाळात.” त्याने मला तिथून जायला सांगितले. परत कधीही मला भेटू नकोस असंही म्हणाला.


मी तिथून निघालो.


काही दिवसांनी मला जीवनचा फोन आला. त्याने कळकळीने माफी मागितली. “तू गेल्यावर मी बराच विचार केला, मी त्या फोटोलाच माझी सर्वात किमती वस्तू समजत होतो. आणि यासर्वात माझं आयुष्य जगायलाच विसरलो होतो. माझ्या आंनदी मित्राला हे सहन नव्हतच होणार कधी, हे मात्र पूर्ण विसरून गेलो होतो. शिवाय तो वर्तमान काळात मला भेटण्यासाठी येत होता पण मी भूतकाळातच होतो, कसा भेटणार त्याला? तू गेल्यावर मात्र त्याचं अस्तित्व मला अनेकदा जाणवलं. माझी त्याला भेटण्याची आस भागली आणि भूतकाळाच्या जाळ्यातून मी मुक्त झालो. थँक यू !


तळटीप : मेरी टॅबोर च्या " To thine own self" या पुस्तकातील एका भागावर आधारित.


**सौ. मधू शिरगांवकर यांची ई साहित्यवरील इतर पुस्तके**

कव्हरवर क्लिक करताच पुस्तके उघडतील



## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १३ वे वर्ष.

## सौ. मधू शिरगांवकर यांचे ईसाहित्यवर हे पाचवे पुस्तक.

सौ. मधू शिरगांवकर एक नामवंत लेखिका आहेत. अनेक नियतकालिकांतून त्यांच्या कथा व इतर साहित्य प्रकाशित होत असते. त्यांची लिखाणाची शैली प्रासादिक आहे. एखाद्या चित्रपटाप्रमाणे त्यांच्या कथा उलगडत जातात, त्याही त्या त्या प्रसंगानुरूप रस, रंग, स्वर, गंधासह. त्यांच्या कथा गूढ असल्या तरी अंधश्रद्धा जोपासणाऱ्या नसतात. उलट एक थेट आणि ठळक असा सामाजिक संदेश त्यांच्या कथांतून दिला जातो. महिला सक्षमीकरण हे त्यांच्या साहित्यातील एक अधोरेखित मूल्य आहे.

सौ. मधू शिरगांवकरांसारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (तेरा पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले

(सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२५ पुस्तके), अनील वाकणकर (८ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (४), अशोक कोठारे (बारा हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १६ पुस्तके), विनीता देशपांडे (७ पुस्तके) उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), पुनम संगवी(४), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(४) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।